cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–४५ रविवार दि.२६ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

पळा, पळा कोण पुढे अशी स्थिती..

लोकसभेसाठीची निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. शनिवारी सहावा टप्पा पार पडला असून, यात मतदानाच टक्का आगोदरच्या टप्प्यांच्या तुलणेत वाढल्याचे दिसून आले आहे. आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते लोकसभा निवडणूक निकालाकडे. अनेकांचे अनेक कयास आहेत. काहींनी अभ्यास केले आहेत. ज्यांचे देशभर नेटवर्क आहे त्यांनी खासगीत सर्व्हे केले आहेत. काहींचे सट्टा बाजारातील सट्ट्यावर लक्ष आहे. ओघानेच जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाहीत जनता कोणाला कौल देते याकडे जगाचे, देशाचे लक्ष आहे.

पंतप्रधानांच्या दौऱ्यातील हॉटेलचे बिल न भरल्याने कायदेशीर कारवाईचा इशारा

म्हैसूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या वर्षी म्हैसूरच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी ज्या हॉटेलमध्ये वास्तव्य केले होते, त्या हॉटेलचे बील अद्याप बाकी आहे. त्यामुळे हॉटेल प्रशासनाने कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण आणि पर्यावरण, वन तसेच हवामान बदल मंत्रालयाद्वारे प्रोजेक्ट टायगर उपक्रमाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे म्हैसूरमध्ये उपस्थित होते. त्यांनी हॉटेल रेडिसन ब्लू प्लाझामध्ये वास्तव्य केले होते.

महाराष्ट्रात १० जूनला मान्सून दाखल होणार!

ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांची माहिती

शेतीला होणार फायदा...

सध्याच्या उष्णतेच्या लाटा सदृश्य स्थिती पाहता, मान्सून पावसाच्या अगोदर वळीव स्वरुपातील पूर्वमोसमी, पावसाच्या सरीही कोसळू शकतात. शेतीच्या मशागतीसाठी त्यांचा उपयोग होवू शकतो असे खुळे म्हणाले. शेतकऱ्यांनी उन्हाळ कामे उरकली असून, ते आता पासवाची वाट पाहत आहेत, त्यात अशा सरी कोसळल्या तर त्या शेतकऱ्यांसाठी फायद्याची ठरणार आहे.

बंगालच्या उपसागरात मान्सून दाखल

नैऋत्य मान्सून एक दिवसापूर्वी मुक्कामी होता, पण आता तो शुक्रवारपासून सक्रिय झाला असून शनिवारी बराच पुढे सरकला आहे. बंगालच्या उपसागरामधील काही भागांमध्ये त्याने प्रवेश केला आहे. पुढील वाटचाल होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले असून, २४ तासांमध्ये तो आणखी काही भागात वेळेपूर्वीच पोचेल, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठे उन्हाचा चटका जाणवत आहे. तर कुठे अवकाळी पाऊस कोसळत आहे. ३१ मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल होणार आहे, तर १० जून दरम्यान मुंबईसह कोकणात मान्सून दाखल होण्याची शक्यता असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे. तर १५ जून दरम्यान कोकणातून सह्याद्रीचा घाटमाथा ओलांडून खान्देश, नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यात तसेच मराठवाडा विदर्भात मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता असल्याचे खुळे म्हणाले.

◀◀ पान २ वर

मराठवाडा, विदर्भात उष्णतेची लाट

विदर्भात आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यात दि.२६ मे पासून गुरुवार दि. ३० मे पर्यंत अवकाळीचे वातावरण निवळून उष्णतेची लाट सदृश्य स्थिती कायम राहण्याची शक्यता जाणवते. मुंबईसह कोकण, खान्देश, मध्य महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यात अवकाळीची स्थितीबरोबरच पुढील आठवडाभर म्हणजे शनिवार दि. १ जून पर्यंत उष्णतासदृश्य स्थिती कायम राहण्याची शक्यता जाणवत असल्याचे खुळे म्हणाले. कोकण वगळता महाराष्ट्रात सध्याचे दुपारचे कमाल तापमान ४० ते ४४ तर पहाटेचे किमान तापमान हे २८ ते ३० डिग्री से.ग्रेड दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

विलासबागेत आज आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन

लातूर । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या ७९ जयंतीनिमित्त आज रविवार दि. २६, मे रोजी सकाळी ९.०० वाजता, बाभळगाव येथिल विलासबागेत सार्वजनिक आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री म्हणून मंत्री म्हणून आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी असंख्य कल्याणकारी निर्णय घेतले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात लोकहित डोळ्यासमोर ठेवून घेतलेले गेलेले अनेक निर्णय ऐतिहासीक ठरले आहेत. शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी, वीजबील माफी, कर्जाचे पुर्नगठन, व्याजात दिलेली सवलत, फलोत्पादन विकासासाठी दिलेल्या प्रोत्साहन, दुष्काळी परिस्थितीत केलेल्या उपाययोजना, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना केलेली मदत, विदर्भातील शेतकऱ्यांना दिलेले विशेष पॅकेज, पशुधन जगविण्यासाठी राबवलेली मोहीम यासह त्यांच्या कार्यकाळातील उपाययोजना, राज्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरल्या आहेत, विविध योजनांच्या माध्यमातून शेती विकासाला चालना देऊन ग्रामीण भागाचा कायापालट करीत असतानाच उद्योग, व्यापार वृद्धीसाठी नियोजन करून राज्याचा समतोल विकास साधण्याची त्यांची कृती आजही मार्गदर्शक ठरते आहे.

सगे सोयरेबद्दलचा निर्णय दबावाखाली घेतल्यास ओबीसी समाज रस्त्यावर उतरणार

प्रकाश शेंडगे यांचा इशारा; मनोज जरांगे यांच्या दडपशाहीला बळी पडू नका

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांनी परत आता चार तारखेला आंदोलनाचा इशारा दिला आहे. मात्र, मनोज जरांगेंच्या आंदोलनाच्या दडपशाहीला बळी पडून सरकारने सगेसोयरेंबाबतचा निर्णय घेतला तर, ओबीसी समाज रस्तावर उतरेल, असा इशारा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी दिला आहे. सगेसोयरेंच्या निर्णयाचा परिणाम ओबीसी आरक्षणावर होणार आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये या आंदोलनाच्या धडपशाहीला त्याठिकाणी बळी पडून जर सरकारने असं काही निर्णय घ्यायचा प्रयत्न केला, तर समाज जो आहे तो पुन्हा रस्त्यावर उतरेल, असेही प्रकाश शेंडगे यांनी म्हटले आहे.

कमी वेळामध्ये साधनं आणि आर्थिक मदत नसतानाही निवडणूक लढलो. प्रकाश शेंडगे म्हणाले, ओबीसी बहुजन पार्टी हा आमचा पक्ष लोकसभा निवडणुकीत नवीन असताना देखील आम्ही १६ उमेदवार उभे केले आहेत. १३ उमेदवार आमच्या पक्षाच्या चिन्हावर लढलेत.

◀◀ पान २ वर

ओबीसी शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांसह, फडणवीस, पवारांना भेटणार

» **कुणबी आणि मराठा हे हा एकच आहे, असा विषय आलेला आहे. पुढे पण हा विषय सुप्रीम कोर्टाने आणि हायकोर्टाने निकालात लावलेला आहे. खत्री कमिशनने कुणबींमध्ये मराठा येत नाही, अशा अहवालात त्या मेन्शन केला आहेत. येत्या मंगळवारी आमचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना आणि भुजबळ साहेबांना भेटणार आहे. आता नवीन विषय चालू आहे ते ताबडतोड थांबवण्यासाठी आम्ही विनंती करणार आहेत, असे प्रकाश शेंडगे यांनी सांगितले.**

राज्यात उष्माघाताचे २५१ रुग्ण

धुळे, नाशिक, जालन्यात रुग्णांची वाढ

मुंबई । प्रतिनिधी

दिवसेंदिवस वाढणाऱ्या तापमानामुळे राज्यात उष्णतेचासामना करावा लागत आहे. या दमट उष्णतेमुळे उष्माघाताच्या रुग्णांची संख्याही वाढत आहे. एक मार्चपासून राज्यात २५१ जणांना उष्माघाताची लागण झाली आहे. सध्या धुळे, नाशिक आणि जालना या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक रुग्ण आहेत.

राज्यात उष्णतेचे प्रमाण वाढत असून, काही जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. १ मार्च ते २० मे पर्यंत राज्यात उष्णतेच्या लाटेत २५१ रुग्ण आढळले आहेत.

यापैकी गेल्या २४ दिवसांत उष्माघाताचे रुग्ण आढळले आहेत.

मुंबईत उष्माघाताचा एकही रुग्ण नसला तरी ठाण्यात ६ तर पालघरमध्ये एक रुग्ण आढळून आला आहे. मार्चच्या तुलनेत एप्रिल आणि मेमध्ये रुग्णांची संख्या वाढली आहे. उष्माघाताच्या रुग्णांची नोंदणी मार्चपासून सुरू करण्यात आली आहे. राज्यात उष्माघाताच्या २५१ रुग्णांची नोंद झाली असून, एप्रिलमध्ये सर्वाधिक रुग्णांची नोंद झाली आहे. मार्चमध्ये ४०, १ ते २६ एप्रिलपर्यंत १४४ आणि २६ एप्रिल ते २० मे या कालावधीत ६७ रुग्ण आढळले आहेत. भंडारा, हिंगोली, पालघर, रत्नागिरी आणि

◀◀ पान २ वर

सर्वाधिक रुग्ण असलेले जिल्हे

धुळे – २०, नाशिक – २८, जालना– २८, बुलढाणा – २२, परभणी – १२, धुळे – २०, सोलापुर – १८ आणि नागपूर –११.

बोगस मतदानाचे व्हिडीओ अन् फेरमतदानाचे काय होणार?

शरद पवार गटाच्या मागणीवर आयोग काय निर्णय घेणार?

बीड । प्रतिनिधी

राज्यामध्ये अनेक लोकसभा निवडणुकीमध्ये गैरप्रकार झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर सुरू आहेत. यामध्ये बीडची चर्चा मात्र जोरात असल्याचे दिसत आहे. बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपने बोगस मतदान केल्याचा आरोप करून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने केला असून आता त्या ठिकाणी फेरमतदान घेण्यात यावे अशीही मागणी त्यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीवर निवडणूक आयोग काय निर्णय घेणार आणि एकामागून एक निघणाऱ्या बोगस मतदानाचे व्हिडीओ आणि फेरमतदानाचे काय होणार? याकडेच आता जिल्हावासियांचे

◀◀ पान २ वर

बोगस मतदानाचा आरोप करण्यात आलेली गावे

» **परळी मतदार संघातील मौजे इंजेगांव, सारडगांव, धर्मापुरी, डिग्रस, नाथ्रा, कौडगांव साबळा, जिरेवाडी, वालेवाडी व कन्हेरवाडी या गावातील मतदान केंद्रावर व मतदान केंद्र क्रमांक १८८, १८९, १३२ व १६१ आणि केज तालुक्यातील देवगाव, लाडेवडगाव माजलगांव मधिल गोविंदवाडी व धारुरमधील सोनिमोहा, पिपरवडा, मंदवाडी व चाटगांव आष्टी मधिल वाली आणि पाटोदा मधिल वाधीरा हे वरिल सर्व मतदान केंद्र ताब्यात घेऊन बोगस मतदान झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.**

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : १२.५० क्विंटल			
	२,३१०	२,५२५	२,४४५
ज्वारी/हायब्रिड : ८१.०० क्विंटल			
	१,८२५	३,२९१	२,४८८
मूग : १.५० क्विंटल			
	५,००१	७,१००	६,०५०
तूर : ६.०० क्विंटल			
	१०,४००	११,८०१	११,१००
उडीद : ०.५० क्विंटल			
	४,०००	४,०००	४,०००
बाजरी: २५.५० क्विंटल			
	२,२५०	२,७००	२,४५०
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन:१८.५० क्विंटल			
	४,५००	४,५००	४,५००
हरभरा: ३.५० क्विंटल			
	५,५०१	६,३००	५,९६७

सहाव्या टप्प्यात मतांचा टक्का वाढला

देशात ५७.७ टक्के मतदान झाले मतदान

नवी दिल्ली। वृतसंस्था

लोकसभा निवडणूकीचा सहावा टप्पा शनिवारी (दि.२५) पार पडला आहे. सहाव्या टप्प्यात ७ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशातील (जम्मू-काश्मीर) ५८ जागांवर मतदान सुरू आहे. दरम्यान, देशातील ७ राज्यांमध्ये निवडणुकीच्या ६ व्या टप्प्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ५७.७ टक्के मतदान झाले आहे.

दिल्लीच्या सर्व ७ जागांवर झालेल्या मतदानाव्यतिरिक्त, मतदारांनी उत्तर प्रदेशातील १४, हरियाणातील १०, बिहार आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी ८, ओडिशातील

◀◀ पान २ वर

दहावीचा निकाल उद्या लागणार

मुंबई । प्रतिनिधी

शिक्षण मंत्री केसरकर यांनी १० वी परिक्षेचा निकाल २७ मे रोजी लागणार असल्याचे संकेत दिले होते. त्यानुसार राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी १० वी परिक्षेचा निकाल २७ मे रोजी जाहिर होणार असल्याची घोषणा शनिवारी केली.

१० वीच्या परिक्षेला राज्यातून १६ लाखाहून अधिक विद्यार्थी बसले होते. या विद्यार्थ्यांचा निकाल २७ तारखेला दुपारी १ वाजल्यापासून ऑनलाईन जाहिर होणार असून, विद्यार्थ्यांना या खालील संकेतस्थळावर तो पाहता येणार आहे.

◀◀ पान २ वर

निवडणूक आयोगाकडून ५ टप्प्यातील मतदानाची आकडेवारी जाहीर

मतांच्या आकड्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोप बिनबुडाचा

नवी दिल्ली । प्रतिनिधी

मतांच्या आकड्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोप बिनबुडाचा असल्याचे स्पष्ट करत भारतीय निवडणूक आयोगाने शनिवारी (दि.२५) पाच टप्प्यांत झालेल्या एकूण मतांच्या टक्केवारीसह एकूण मतांची आकडेवारी जाहीर केली. या डेटामध्ये आयोगाने प्रत्येक लोकसभा मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या आणि मतदान केलेल्या वास्तविक मतदारांची संख्या जाहीर केली आहे.

निवडणूक आयोगाने आपला अहवाल सादर करताना मतांच्या संख्येत कोणताही बदल झाला नसल्याचा दावाही केला आहे. निवडणूक प्रक्रियेचा विपर्यास करण्यासाठी खोट्या गोष्टी रचणे ही करमणूक झाली आहे, असेही आयोगाने म्हटले आहे. मतांच्या आकड्यांबाबत होत असलेले आरोप हे

◀◀ पान २ वर

खोट्या आरोपांमुळे निवडणूक प्रक्रियेत अडथळा

फॉर्म १७ द्वारे, मतदानाच्या दिवशीच उमेदवारांच्या एजंटसह डेटा सामायिक केला जातो. ते नंतर कसे बदलता येईल? हा डेटा मतदार मतदान ॲपवर २४ तास उपलब्ध असतो, जो कोणीही कधीही पाहू शकतो. अशा स्थितीत मतांच्या संख्येत अनियमितता असण्याचा प्रश्नच येत नाही. खोट्या आरोपांमुळे निवडणूक प्रक्रियेत अडथळा येतो, असेही निवडणूक आयोगाने नमूद केले आहे.

पाच टप्प्यात झालेले मतदान

» **पहिल्या टप्प्यात एकूण १६,६३,८६,३४४ मतदार होते आणि एकूण ११,००,५२,१०३ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. पहिल्या टप्प्यातील मतदानाची टक्केवारी ६६.१४ इतकी होती. दुसऱ्या टप्प्यात एकूण १५,८६,४५,४८४ मतदारांपैकी १०,५८,३०,५७२ मतदारांनी मतदान केले. दुसऱ्या टप्प्यात एकूण ६६.७१ टक्के मतदान झाले. तिसऱ्या टप्प्यात १७,२४,०४,९०७ मतदार होते, तर ११,३२,३४,६७६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या टप्प्यात ६५.६८ टक्के मतदान झाले. चौथ्या टप्प्यात ६९.१६ टक्के मतदान झाले. एकूण १७,७०,७५,६२९ मतदारांपैकी १२,२४,६९,३१९ मतदारांनी मतदान केले. पाचव्या टप्प्यात एकूण ८,९५,६७,९७३ मतदारांपैकी ५,५७,१०,६१८ जणांनी मतदान केले. पाचव्या टप्प्यात ६२.२० टक्के एवढे मतदान झाले.**

अग्रलेख

पळा, पळा कोण पुढे अशी स्थिती...

लोकसभेसाठीची निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. शनिवारी सहावा टप्पा पार पडला असून, यात मतदानाच टक्का आगोदरच्या टप्प्यांच्या तुलणेत वाढल्याचे दिसून आले आहे. आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते लोकसभा निवडणूक निकालाकडे. अनेकांचे अनेक कयास आहेत. काहींनी अभ्यास केले आहेत. ज्यांचे देशभर नेटवर्क आहे त्यांनी खासगीत सर्व्हे केले आहेत. काहींचे सट्टा बाजारातील सट्ट्यावर लक्ष आहे. ओघानेच जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाहीत जनता कोणाला कौल देते याकडे जगाचे, देशाचे लक्ष आहे.

महाराष्ट्रात षटकोनी पक्षांची दुरंगी लढत आहे. मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष आहे. प्रथमच लोकसभा निवडणुकीत मतदारांना पैसे वाटप झाले अशा तक्रारी आहेत. देशात मोठ्या प्रमाणात नोटा जप्त झाल्या आहेत. ओघानेच महाराष्ट्रात काय होणार, खरे कोण, नकली कोण, बारामतीत काय होणार, छोटे-छोटे पक्ष काय निर्णय करणार, यदा-कदाचित भाजपाचे स्पष्ट बहुमत घसरले तर एनडीए घटक पक्ष आणि इंडिया आघाडीतील घटक पक्ष कोणती भूमिका घेणार हे आणि असे असंख्य प्रश्न सर्वांच्या मनात घोळताना दिसत आहेत. जोडीला ज्यांचे मतदान मशिनबद्ध झाले आहे. त्यांची धाकधूक वाढली आहे. सर्वजण लोकमताचा फैसला काय येतो यासाठी चार जूनची प्रतीक्षा करत आहेत. चार जून ही निकालाची तारीख आहे. एक जून रोजी शेवटच्या टप्प्याचे मतदान होणार आहे आणि त्याचदिवशी सायंकाळी सहानंतर एक्झीट पोलचे निष्कर्ष समोर येतील आणि त्यानंतर हालचालींना प्रारंभ होईल. इंडिया आघाडीतील राहूल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे वगैरे मंडळी सत्ताबदल होणार. इंडिया आघाडी जिंकणार, भाजप फुटणार असे सांगत आहेत तर भाजपाची एनडीए महायुती अबकी बार चारसो पार म्हणत आहे. एनडीएने महाराष्ट्र-कर्नाटकात फटका बसणार हे गृहीत धरुन दक्षिण भारतात जबरदस्त कष्ट घेतले आहेत. त्यामुळे त्यांना ४०० नसल्या तरी ३७० तरी जागा मिळतील असा दावा आहे. रणनितीकार प्रशांत किशोर यांनी भाजप किमान ३१० जागा जिंकून मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करेल असे चौथ्या टप्प्याच्या मतदानानंतर म्हटले आहे तर डावे विचारवंत वेगळेच सांगत आहेत. राहूल गांधी यांनी भाजपा दीडशे जागा मिळवेल असे म्हटले आहे. फलोदी सट्टा बाजाराने भाजपा ३७० पार करेल असे म्हटले आहे. भाजपाने स्वत:चे मूल्यमापन केले आहे त्यामध्ये ३१७ पेक्षा कमी जागा नाहीत, अशी आकडेवारी आहे. पण हे सारे अंदाज झाले. खरा कौल चार तारखेला येईल व संध्याकाळी दिल्लीत आणि गल्लीतही लाडू, पेढे वाटले जातील. ओघानेच चार जून अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रासाठी चार जूनचा निकाल दिल्लीत कुणाचे सरकार आणि खरी शिवसेना, खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा इतपत मर्यादित नाही. या निकालांचे चिंतन होईल आणि अनेकांना नवे घुमारे फुटतील. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात किंवा त्यापूर्वीच काही दुकाने बंद होतील. पळा, पळा कोण पुढे तो अशी स्थिती होऊ शकते. पळायची दिशा ही निकाल आणि मतदानाची टक्केवारी यावर अवलंबून राहिल. भाजपा युतीने दहा टक्के मराठा आरक्षण दिले पण मराठा आंदोलनाचे नेते जरांगे-पाटील हे खुश नाहीत. लोकसभा निवडणुकीत घसरलेला मतदानाचा टक्का नाराज मराठा समाज असावा असा तर्क आहे. जरांगे फॅक्टर बीड, मराठवाड्यात आणि काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात सुप्त सक्रिय दिसला तरी तो महायुतीला जोराचा फटका देण्याची शक्यता आहे. निकाला पाठोपाठ लगेचच जरांगे यांनी आंदोलनाची घोषणा केली आहे व मराठा आंदोलक सर्व आरक्षित घटकांना सोबत घेऊन विधानसभेच्या २८८ जागा लढवणार असे म्हटले आहे. त्यामुळे लोकसभेचा निकाल व जरांगे फॅक्टरचा परिणाम पहावा लागेल. भाजपाने विधानसभा निवडणूक महायुती म्हणून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढणार असे म्हटले आहे. पण खरी शिवसेना, नकली शिवसेना, शरद पवारांनी काँग्रेस विलीनीकरणाचे दाखवलेले गाजर अशा अनेक गोष्टी आहेत. त्याचे परिणाम चार जून नंतर दिसतील.

कल्याण नगर येथे भगवान गौतम बुद्धांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण जगाला शांततेचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांची २५६८ वी जंयती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. विजयमाला सहजराव उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून आयु. प्रशांत वासनिक, अण्णासाहेब शेळके, चंद्रप्रकाश शिंदे, अर्जुन जौंजाळ, अविनाश पायके, पत्रकार आयु. आत्माराम वाव्हळकर यांची उपस्थिती होती. माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या कल्याण नगर येथे तथागत भगवान गौतम बुद्धांची जयंती गुरुवार दिनांक २३ मे रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती उत्सव कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. या बुद्धवंदने नंतर अविनाश पायके, अण्णासाहेब शेळके, अर्जुनराव जंजाळ, चंद्रप्रकाश शिंदे, पत्रकार आत्माराम वाव्हळकर, यांनी गौतम बुद्धाच्या जीवनावर आपले विचार मांडले. या वेळी उपस्थित बांधवांना मार्गदर्शन करताना आयु. प्रशांत वासनिक यांनी भारत देशाला समृद्ध आणि बलशाली बनविण्यासाठी भगवान गौतम बुद्धांच्या विचाराची गरज असुन सुखी जीवनासाठी विचार आत्मसात करा असे आवाहन करून पाच शिला पैकी एक शिलाचे महत्व पटवून दिले व स्वखर्चातून ज्या मुलांनी बुध्दांनी सांगितलेल्या २२ प्रतिज्ञाचे पाठातंर केले अशा १० मुलांना भारताचे संविधान व बुद्ध ऍन्ड धम्म हे ग्रंथ भेट दिले.

पत्रकार संघाची मागणी लोकसभेत लावून धरू-निलेश लंके

» सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या शिष्टमंडळाला ग्वाही

अहमदनगर । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील पत्रकारांची प्रश्न आपणाला माहित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने निवेदनात केलेली मागणी आपण संसदेच्या सभागृहात लावून घेऊ अशी ग्वाही अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी दिली तर लोकसभा निवडणुकीवर निकालानंतर इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर येणार असून आपलाही विजय पक्का आहे असा दावाही त्यांनी केला.

महाराष्ट्राचे पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वास आरोटे यांचे नेतृत्वाखाली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरचंद्र पवार गटाचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांची भेट घेऊन केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना वार्षिक काय करात पाच हजार रुपये सूट द्यावी या मागणीचे निवेदन दिले. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात विविध पक्षाच्या उमेदवारांना पत्रकारांच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी निवेदन देण्याची मोहीम राबवण्यात आली याच मोहिमे अंतर्गत पत्रकार संघाचे सरचिटणीस विश्वास आरोटे यांनी पत्रकार संघाच्या वतीने सुरू असलेल्या मोहिमेची माहिती दिली. यावेळी निलेश लंके यांनी पत्रकारांचे प्रश्न आपणाला जवळून माहित आहेत, आपल्या देशात पत्रकारांचा मोलाचा वाटा आहे त्यामुळे लोकसभेत प्रकारांचे प्रश्नांना आपण प्रधान्य देऊ.प्रदेशाध्यक्ष वसंत राव मुंडे राज्य संघटक संजय भोकरे यांनी बेळगाव दिल्ली गुजरात महाराष्ट्र गोवा राज्यात पत्रकारांचे चांगले संघटन केले असून पत्रकारांच्या विविध प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचे योगदान आहे. वसंत मुंडे यांनी केलेली मागणी वृत्तपत्र सृष्टीला नवीन ऊर्जा देणारी आहे त्यामुळे केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर आपण या मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करून अशी ग्वाही त्यांनी लोकसभा निवडणुकीनंतर देशात इंडिया आघाडी सरकार येणार आहे आणि अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून आपला विजय निश्चित असल्याचा दावाही त्यांनी केला.यावेळी पत्रकार संघाचे डायरी, दिनदर्शिका व माहिती पुस्तिका देण्यात आली. यावेळी दैनिक समर्थ गावकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यासह पत्रकार व संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

दोन पोलिस अधिकारी निलंबित

सुरेंदर अग्रवाल यालाही अटक, ड्रायव्हरला पोलिस संरक्षण देणार; पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांची माहिती

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील कल्याणीनगर येथे दारू पिऊन पोर्शे कार भरधाव वेगात चालवित दोघांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या एका बिल्डरच्या मुलास वाचविण्यासाठी दोन पोलिस अधिकाऱ्यांनी मदत केल्याची माहिती पुढे आली. त्यानुसार त्या दोन पोलिस अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आल्याची माहिती पुणे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी शनिवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार पुढे म्हणाले की, अपघात झाल्यानंतर अगरवाल यांच्या ड्रायव्हरला सुरेंदर अगरवाल यांनी दोन दिवस घरातच कोंडून ठेवले. तसेच त्याला धमकी देऊन तर अमिष देऊन गाडी चालवताना तो मुलगा नव्हता तर हा ड्रायव्हर होता असा जबाब द्यायला भाग पाडल्याची माहिती तपासा दरम्यान पुढे आली. तसेच त्या दबावामुळे ड्रायव्हरने सुरुवातीला तसा जबाब दिल्याचे सांगितले. त्यामुळे आता प्रसंगी ड्रायव्हरलाही आम्ही संरक्षण देऊ असे आश्वासनही यावेळी त्यांनी दिले. पुढे बोलताना पोलिस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले की, सुरेंदर अगरवाल यांच्या घराची झडती घेण्यात आली आहे. यापूर्वी अपघातातील अल्पवयीन मुलाला सोबत घेऊन त्याच्या घराची झडती घेण्यात आली. त्यात घरातील सीसीटीव्हीच्या फुटेजमध्ये हस्तक्षेप करण्यात आल्याचे दिसून आले असल्याचेही यावेळी सांगितले. अमितेश कुमार म्हणाले की, नातवाला वाचविण्यासाठी ड्रायव्हरवर दबाव आणल्याप्रकरणी सुरेंदर अगरवाल यालाही अटक करण्यात आली आहे. त्यामुळे अगरवाल कुटंबातील तीन पिढ्यांना पोर्शे कार अपघात प्रकरणी अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याची फसवणूक खपवून घेतली जाणार नाही-राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

बोगस बियाणे बोगस खते बनवणारे रॉकेट सक्रिय झाले आहेत अनेक नामंकित कंपनीचे बोगस बियाणे तयार करून जास्तीच्या नफ्यासाठी विक्री केली जाते हे दुर्दैवी प्रकार आहे.

काही लालची व्यापाऱ्याच्या थोड्याशा नफ्या पोटी शेतकऱ्याच कुटुंब उद्ध्वस्त होत याची जाणीव ठेवावी व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचं आयुष्य उद्ध्वस्त करण्याचं काम करू नये प्रशासनाने शेतकऱ्याच्या भवितव्याशी खेळणाऱ्या बोगस खत, बी -बियाणे विक्री करणाऱ्या रॉकेट, लालची व्यापारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी व बाजारात येणारे बोगस खत बी बियाणे यांच्यावर प्रतिबंध करण्यात यावा या साठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाधकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले या वेळी बोगस खत बी बियाणे विक्री करणाऱ्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास आबा पाटील, शिवसंग्राम उपशहराध्यक्ष शेषेराव तांबे,वाहतूक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख आबेदभाई शिवसंग्राम नेते नामदेव धांडे,मुकुंद गोरे, सातिराम ढोले,कैलास शेजाळ,अल्पसंख्यांक आघाडीचे शेख अखिलभाई, पेठ बीड विभाग प्रमुख शेख लालभाई,शेख नदीम गणी,सुनील थोरात,कुंदन गायकवाड,श्रीकृष्ण परजणे, हरिचंद्र ठोसर,सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रा.पंडित शेंडगे तथा अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पंढरपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आषाढीची पूजा होणार!

सोलापूर । प्रतिनिधी

सहा ते एकवीस जुलै दरम्यान पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीची आषाढी यात्रा होणार असून १७ जुलै रोजी पहाटे अडीच वाजता मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय पूजा होणार आहे. यदा दहा ते बारा लाख भाविक येण्याची शक्यता असून १५ जून पूर्वी पालखी मुक्काम ठिकाणी पायाभूत सुविधांची कामे पूर्ण करण्याची सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी केली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आषाढी वारी संदर्भात पूर्वतयारी आढावा बैठक झाली. या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी अधिका-यांना मार्गदर्शन केले. यावेळी पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी तथा इन्सिडेंट कमांडर मोनिका सिंह ठाकुर, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे मुख्य अधिकारी राजेंद्र शेळके, माळशिरस उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, पंढरपूर उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, महावितरणचे अधीक्षक अभियंता पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास मुळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्ती सागर ढोले आदी उपस्थित होते.

पाचव्या टप्प्यात महिलांनी मारली बाजी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. निवडणुकीतील मतदानाचे पाच टप्पे पूर्ण झाले असून पहिल्या चार टप्प्यापेक्षा पाचव्या टप्प्यात पुरुषांपेक्षा महिलांनी अधिक मतदान केल्याची माहिती निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. दरम्यान, निवडणूक आयोगानं देशातील लोकसभा निवडणुका सात टप्प्यात जाहीर केल्या होत्या. यापैकी पाच टप्प्यातील मतदान पार पडलं आहे. मात्र, पाचव्या टप्प्यात एक वेगळी गोष्ट घडली आहे. पाचव्या टप्प्यातील मतदानात महिला मतदारांनी आघाडी घेतली असून ही अत्यंत आनंदाची बाब आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांचे एकूण मतदान ६७.१८ टक्के झाले, तर पुरुषांचे मतदान ६७.०२ टक्के झाले. तुलनेने महिलांचे मतदान जास्त होते. या वेळी २० मे रोजी पाचव्या टप्प्यात आठ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ४९ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. या टप्प्यात एकूण ६२.२० टक्के मतदान नोंदवले गेले. त्यापैकी पुरुष मतदारांचे मतदान ६१.४८ टक्के झाले, तर महिलांचे मतदान ६३ टक्के झाले. जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये महिला मतदारांचे मतदान कमी नोंदवले गेले. या टप्प्यात मतदान झालेल्या ४९ मतदारसंघांपैकी २४ मतदारसंघांमध्ये महिला मतदारांचे प्रमाण जास्त होते, त्यापैकी २२ मतदारसंघांमध्ये २०१९ मध्येही हाच कल नोंदवला गेला होता.

श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराजांचा दुर्दैवाने नुकताच अपघात झाला होता. आज त्यांची पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली.

पान १वरून...

महाराष्ट्रात १० जूनला

सध्या मान्सून प्रगतीपथावर आहे. शनिवारी बंगालच्या उपसागराचे निम्मे क्षेत्र तसेच श्रीलंकेचा भुभागही दोन हिस्याने काबीज केला असल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली. मान्सूनची बंगाल शाखा कदाचित लवकरही सक्रिय होवु शकते. तसे झाल्यास सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी लगतच्या जिल्ह्यात, मध्य महाराष्ट्र व खान्देशपेक्षा मान्सूनचे आगमन तेथे कदाचित अगोदरही होवु शकते. असे ते म्हणाले. अर्थात हे सर्व जूनच्या पहिल्या आठवड्यातील मान्सूनच्या घडामोडीवर अवलंबून असेल असे माणिकराव खुळे म्हणाले. बंगालच्या उपसागरात तयार झालेले अतितीव्र स्वरुपातील ' रेमल ' नावाचे चक्रीवादळ सोमवार २६ मे ला मध्य रात्रीला ताशी १३० ते १३५ किमी. चक्रकार वारा वेगाने बांगलादेश किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. मान्सून वाटचालीवर तसेच महाराष्ट्रात चालू असलेल्या उष्णता लाट सदृश्य स्थितीवर त्याचा कोणताही विपरीत परिणाम जाणवणार नाही, असे खुळे म्हणाले. आशियाई देशांनी एकत्रित येऊन त्यांच्या प्रादेशिक भाषेत चक्रीवादळ संबंधी सुचवलेली नावे व बनवलेली यादीनुसार आता येणाऱ्या चक्री वादळासाठी ओमान देशाने सुचवलेल्या 'रेमल' नाव येत आहे. म्हणून या पूर्वमोसमी हंगामातील चक्रीवादळाला 'रेमल' नांव दिले आहे. अरेबिक भाषेतील त्याचा अर्थ 'वाळू' किंवा 'रेती' होतो.

सगे सोयरेबद्दलचा निर्णय

या निवडणुकीच्या माध्यमातून आम्ही मैदानामध्ये आहोत. ओबीसी बहुजन पार्टी निवडणुकीत उतरली आहे. ही निवडणूक कमी वेळामध्ये साधनं आणि आर्थिक मदत नसताना आम्ही एवढा मोठा प्रमाणात ही निवडणूक लढलो. जय आणि पराजयाची आम्हाला चिंता नाही. किंवा त्याचा पर्वाही नाही. येणारी विधानसभा निवडणूक मात्र पूर्ण ताकतीने लढणार आहोत. उद्या आमची कार्यकारणीची बैठक आहे, त्यामध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुकीला कशा पद्धतीने समोर जायचे, याची रणनीती ठरणार आहे. पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, ओबीसींच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर जिल्ह्याजिल्ह्यामध्ये शासनाच्या विरोधात आंदोलन करून या ठिकाणी प्रचंड मोठा उद्रेक होईल. त्यातून जे काय परिणाम होतील सर्व जबाबदारी महाराष्ट्र सरकारवर असेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

बोगस मतदानाचे व्हिडीओ

लक्ष लागले आहे. बीडमधील बोगस मतदानाचे व्हिडीओ सोशल मीडियामध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने थेट निवडणूक आयोगाकडेच या व्हिडीओचा पुरावा देत बीड जिल्ह्यात कशाप्रकारे बोगस मतदान झाले हे दाखवून दिले. कुठे मतदान कर्मचाऱ्यांना दमदाटी केली जातेय तर कुठे मतदारावर दबाव टाकला जात असल्याचे यातून दिसत आहे. याच बोगस मतदानाची आधी रोहित पवार यांनी, त्या नंतर स्वतः शरद पवार यांनी सुद्धा तक्रार करत बीड जिल्ह्यात फेरमतदान घेण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे १३ तारखेला मतदान झाल्यानंतर त्याच रात्री बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी निवडणूक आयोगाकडे २२ गावांमध्ये बोगस मतदान झाल्याचा आरोप केला होता. त्यामुळे आता निवडणुक आयोग या वादग्रस्त गावांबाबत काय निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

राज्यात उष्माघाताचे

सांगली जिल्ह्यात प्रत्येकी एक रुग्ण, रायगड, वासीम, बीडमध्ये प्रत्येकी दोन रुग्ण, अमरावती, अहमदनगर, छत्रपती संभाजी नगरमध्ये प्रत्येकी तीन रुग्ण, जळगाव आणि अकोला येथे ५ रुग्ण रुग्ण आढळले आहेत. तसेच गडचिरोली, गोंदिया, कोल्हापूर, ठाणे, वर्धा येथे प्रत्येकी सहा आणि पुण्यात आठ रुग्ण आढळले आहेत. मुंबई शहर आणि उपनगरात उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही.

दहावीचा निकाल उद्या

https://mahresult.nic.in
http://sscresult.mkcl.org
https://sscresult.mahahsscboard.in
https://results.digilocker.gov.in
https://results.targetpublications.org

१० वीच्या विद्यार्थ्यांना स्वतःला मिळालेले गुण तर पाहता येणारच आहेत. त्याशिवाय डिजी लॉकरच्या सुविधेमुळे गुणपत्रिकाही संग्रहीत करता येणार आहे. याशिवाय मिळालेल्या गुणांबाबत काही शंका असल्यास गुणपडताळणी करण्यासाठी २८ ते ११ जून या कालावधीत ऑनलाईन शुल्क भरून त्यासाठी अर्ज भरता येणार आहेत.

सहाव्या टप्प्यात मतांचा

६, झारखंडमधील ४ जागा आणि जम्मू आणि काश्मीर मधील एका जागेसाठी मतदान झाले. मतदानाच्या सहाव्या टप्प्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप राष्ट्रपती जगदीप धनखर, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, भाजप नेते मनोज तिवारी, हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वड्रा यांच्यासह अनेक प्रमुख व्यक्तींनी मतदान प्रक्रियेत भाग घेऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.

मतदान टक्केवारी पुढीप्रमाणे :

बिहार- ५२.२४, हरियाणा- ५५.९३, जम्मू काश्मीर- ५१.३५, दिल्ली- ५३.७३ टक्के, ओडिशा ५९.६ टक्के, उत्तर प्रदेश ५२.०२ टक्के, पश्चिम बंगाल- ७७.९९ टक्के आणि झारखंडमध्ये ६१.४१.

निवडणूक आयोगाकडून ५ टप्प्यातील

वातावरण बिघडवण्याचा डाव असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले असून, सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे आणि निर्णय यामुळे निवडणूक प्रक्रियेला बळ मिळाले आहे. यामुळे आयोगाला कोणत्याही दबावाशिवाय लोकशाही प्रक्रियेचे पालन करण्याची जबाबदारीची जाणीव होते. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या पारदर्शक पद्धतीने सार्वजनिक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. पारदर्शक व्यवस्थेबाबत अधिक स्पष्टीकरण देताना आयोगाने म्हटले आहे की, मतदान केंद्रावर पडलेल्या एकूण मतांची अंतिम यादी उमेदवारांना दिली जाते. अधिकृत एजंटांकडे देशातील सर्व ५४३ संसदीय मतदारसंघांमधील प्रत्येकी १०.५ लाख बूथसाठी विशिष्ट फॉर्म १७ सी आहे. एजंटना मतदान केंद्रांपासून स्ट्रॉंग रूममध्ये स्टोरेजपर्यंत इव्हिएम आणि फॉर्म १७ सी सह वैधानिक कागदपत्रे घेऊन जाण्याची परवानगी आहे. आयोगाने विनंती केली आहे की उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी फॉर्म १७ ची प्रत घेऊन मतमोजणी केंद्रात यावे आणि प्रत्येक फेरीत मोजण्यात आलेल्या मतांची पूर्तता करावी. मतदानाच्या टक्केवारीतही कोणताही बदल झालेला नाही.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २६ मे २०२४ ३

सौ.के.एस.के. महाविद्यालय दिनांक २७ व २८ मे रोजी होणाऱ्या नॅकसाठी सज्ज

बीड । प्रतिनिधी

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास नॅक समिती चौथ्या फेरीतील पुनर्रमुल्यांकन साठी दिनांक २७ व २८ मे २०२४ रोजी महाविद्यालयास भेट देणार आहे. या निमित्ताने महाविद्यालयातील सर्व विभाग व परिसर सुसज्ज करण्यात आलेला आहे. या निमित्ताने गेल्या पाच वर्षामागील गुणवंत विद्यार्थी,विविध क्षेत्रातील महाविद्यालयाची प्रगती समाजभिमुख शिक्षण या संबंधाने नॅकद्वारे तपासणी होणार आहे.तरी सर्व आजी माजी विद्यार्थी, पालक यांनी या भेटी दरम्यान महाविद्यालयात बहुसंख्येने उपस्थित रहावे.असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर संचालक डॉ.सतिश माऊलगे, आय.क्यु.ए.सी.समन्वयक डॉ.सोनाजी गायकवाड, कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने यांनी केले आहे.

वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण !

शहरातील व गावातील रस्ते झाले निर्मनुष्य

ज्योतीराम पाढंरपोटे ।
माजलगाव:-

वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले असून,सूर्य आग ओकू लागला आहे.दिवसा ४२ पर्यंत तापमान, सायंकाळच्या वेळी वादळी वारे व कुठेतरी हलकासा अवकाळी पाऊस अन्? रात्री पुन्हा वाढते तापमान यामुळे सध्या नागरिक उष्णतेमुळे हैराण झाले आहेत.

अवकाळीच्या इशार्यानंतर आता हवामान खात्याने पुढील काही दिवस तापमानात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. उन्हाच्या तडाख्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.शेतकरी,मजुर व कामगार वर्ग सोडल्यास अधिकतर नागरिकांनी घरात राहणे पसंत केल्याने गावातील रस्ते निर्मनुष्य झाले आहेत.काही दिवसांपासून गावात उन्हाचे चटके अधिकच जाणवू लागले आहेत. वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होऊ लागली आहे. तसेच पुढील काही दिवस उष्णतेचा पारा वाढणार असल्याने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.यामुळे प्रत्यक्ष तापमानापेक्षा उष्णतेची जाणीव अधिक होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.नागरिक टोपी,छत्र्या व रुमाल घेऊनच बाहेर पडत आहेत.तर, अनेकांनी शीतपेयांच्या गाड्यांकडे आपला मोर्चा वळवला आहे.

सूर्य अक्षरश: आग ओकत असल्याने रस्ते दुपारी निर्मनुष्य होत असल्याचे पाहायला मिळत आहे.सकाळी दहानंतर वाढलेल्या तापमानामुळे सायंकाळी सातपर्यंत उष्ण झळा कायम राहतात. बाजारपेठेवरही याचा परिणाम पहावयास मिळत आहे.उन्हात खरोखरच घराबाहेर पडायची गरज असेल तर संरक्षणार्थ डोक्याला टोपी, रुमाल व डोळ्याला गॉगल लावावेत. उन्हातून घरात आल्यानंतर थंड पाणी पिणे टाळावे. अतिथंड पाणी पिल्यास मेंदूचा रक्तपुरवठा कमी होतो.नागारिकांनी आहाराचीही काळजी घ्यावी, असा सल्ला डॉक्टर देत आहेत.

उन्हाळ्यात डिहायड्रेशनमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात

वाढत्या तापमानामुळे उन्हाच्या झळा मोठ्या प्रमाणात जाणवत आहेत. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे गरजेचं आहे.या वाढत्या तापमानात अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्याही उद्भवतात.प्रचंड उष्णतेमुळे नागरिक बेशुद्ध पडल्याचे दिसत आहेत.

उष्णतेची लाट टाळण्यासाठी काय करावे

* उन्हाळ्यात शरीर हायड्रेट ठेवणे गरजेचं आहे त्यामुळे भरपूर पाणी प्या.शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे चक्कर येणे,अशक्तपणा जाणवणे यांसारख्या समस्या जास्त जाणवतात. तसेच उन्हाळ्यात तुमच्या आहारात पाणी,नारळपाणी, पाणीयुक्त पदार्थ आणि ज्यूस यांचा समावेश नक्की करावा.सर्वात महत्वाचं म्हणजे उन्हाळ्यात चहा-कॉफी कमी प्या.यामुळे तुम्ही डिहायड्रेट देखील होऊ शकता.

* घराबाहेर पडताना बाहेर काळजी घ्या.

तसेच शक्यतो दुपारी १२-३ च्या दरम्यान शक्य तितक्या कमी घराबाहेर पडण्याचा प्रयत्न करा.* तसेच कमी रक्तदाबापासून बचाव करण्यासाठी लिंबू सरबत प्या.

उन्हाळ्यात प्रथिने युक्त नाश्ता करा.

स्ट्रॉबेरी, संत्री, काकडी आणि टरबूज यांचा आहारात जास्त प्रमाणात समावेश करावा. उन्हाळ्यात ताक पिणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते''

केज येथे वादळी वाऱ्याने बस स्टँड समोरील झाडे मोडून पडले : तिघे जखमी

केज । प्रतिनिधी

केज येथे अवकाळी वादळ आणि पावसाने बस स्टँड समोर झाडे मोडून पडली असून त्याच्या खाली एक मोटार सायकल दबलेले आहे. तसेच बस स्थानकात लावलेले होर्डींग सुद्धा पडले आहे. त्याच्या खाली एका स्कुटीचे नुकसान झालेले. यात तिघेजण किरकोळ जखमी झाले आहेत. त्यात एक वृद्ध महिला, एक वृद्ध पुरुष आणि एका १७ वर्षाच्या मुलाचा समावेश आहे.

शनिवार दि. २५ मे रोजी सायंकाळी ५:०० केज येथे प्रचंड वेगाने वादळी वारे आणि पाऊस सुरू झाला. त्यात बस स्टँड समोरील मुख्य महामार्गा लगत असलेली जुने झाड आणि त्याच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या त्याखाली एक मोटार सायकल दबली आहे तसेच त्याच वेळी रस्त्याने जात असलेली प्रयागाबई मेघराज हाके, शिवाजी माणिक लांडगे आणि ओंकार संतोष पारखे हे जखमी झाले आहेत. तसेच बस स्टँड आवारात नवनाथ रसवंती शेजारी असलेले लोखंडी होर्डिंग तुटून खाली पडले. त्या होर्डिंग खाली एक स्कूटी दबून तिचे नुकसान झाले आहे.

मुंबईत होर्डींग पडून झालेली प्रन्ह प्राणहानी घटना ताजी असतानाच तोच प्रकार केज मध्ये झाला आहे. बस स्टँड मधील या होर्डींग शेजारी झाड असल्याने अनेक वेळा सावलीसाठी तेथे प्रवाशी व नागरिक थांबलेले असतात.

समाजातील वंचितांना प्रवाहात आणण्यासाठी रोटरी क्लबचा पुढाकार महत्वपूर्ण -प्रसाद चिक्षे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समजतील उपेक्षित,वंचित, दिव्यांग यांना प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी रोटरी क्लबचा सातत्याने पुढाकार आहे. आज अनेक दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव देऊन त्यांच्या जीवनाला आधार दिला. असे प्रतिपादन ज्ञान प्रबोधिनीचे समन्वयक प्रसाद प्रसाद चिक्षे यांनी केले.

येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात शुक्रवारी सकाळी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व मुंबई येथील रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, यांच्या संयुक्त विद्यमाने जयपुर फूट व हात व मोफत साहित्याचे वाटप ११३ दिव्यांगाना करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्रसाद चिक्षे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय अंबेकर,जगन सरवदे,रोटरीचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत,डॉ. नवनाथ घुगे, प्रा.संतोष मोहिते रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टचे तंत्रज्ञ गौरव पारीख,अदमान शेख,मनोज चव्हाण,राजेश माने उपस्थित होते.

११३ दिव्यांगाना जयपूर फूट, हात, व विविध साहित्याचे वाटप

यावेळी बोलताना प्रसाद चिक्षे म्हणले की समाजाकडे संवेदनशील दृष्टीने पाहून सेवाभाव जोपासला पाहिजे. दिव्यांग व्यक्तींना मदत करून त्यांना भक्कम आधार देण्याचे काम रोटरी करत असल्याचे त्यांनी कौतुक केले. यावेळी बोलताना दत्तात्रय अंबेकर यांनी अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव कसे मदतीचे ठरतात. त्यांना स्वावलंबी करण्याची किमया या माध्यमातून साध्य केल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साहित्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील परदेशी यांनी केले.संचलन जगदीश जाजू यांनी तर उपस्थितांचे आभार ओंमकेश दहीफळे यांनी मानले. यावेळी रोटरी क्लबचे सुहास काटे,कल्याण काळे,धनराज सोळंकी,ललित बजाज,प्रवीण चोकडा,प्रदीप झरकर,गोरख मुंडे, राजेंद्र घोडके, संभाजी बुर्गे,यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सीबीएससी मध्ये ९२ टक्के घेवुन गणेश घुगे उत्तीर्ण

बीड । प्रतिनिधी

बीड येथिल गुरूकुल इंग्लिश स्कुलमधील विदयार्थी गणेश लक्ष्मण घुगे यांनी सीबीएससी मध्ये ९२ टक्के गुण घेऊन १० मध्ये उत्तीर्ण झाला असुन या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असुन त्याचा ठिकठिकाणी ह्रदयसत्कार करण्यात येत आहे नेकनुर येथे त्याच्या यशाबद्दल त्याचा ह्रदयसत्कार करताना नेकनुर पोलिस स्टेशनचे बालासाहेब ढाकणे,कालिदास सारूक,लालासाहेब ढाकणे डॉ योगेश ढाकणे,यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला व त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ नाथमुद्रा प्रतिष्ठान आणि नाथमुद्रा बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षनाथ जयंती निमित्त नाथदीक्षा कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ नाथ मुद्रा प्रतिष्ठान आणि नाथमुद्रा बचत गट यांच्या संयुक्त वैद्यमाने गोरक्षनाथ जयंती निमित्त नाथ दीक्षा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा महासंघचे अध्यक्ष भरत चव्हाण साहेब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते माननीय श्रीमान डॉ. योगेश क्षीरसागर तसेच महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माननीय जयाजी नाथ साहेब आणि व्ही.बी नाथ साहेब हे होते डॉ के बी पैठणकर नामवंत कीर्तनकार ह भ प भरत महाराज जोगी प्रा बालकनाथ यादव मु.अ.संजय सावंत सर डॉ पिराजी पाखरे व्याख्याते तसेच संजय चव्हाण डॉ गजानन चव्हाण मराठवाडा अध्यक्ष सोमनाथ धायडे कांचन धायडे कल्याण धायडे राहुल कासार धनराज जोगी गणेश धायडे सोमनाथ राजगुरे डॉ सुदाम मोगले डॉ गिरी डॉ गायकवाड राजकुमार शेळके श्री नागरगोजे

बलभीम कदम राजेंद्र कदम सुनील जाधव विजयकुमार बामणे एडवोकेट राजेंद्र बन यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष जयाजी नाथ साहेब यांनी समाजाच्या विविध प्रश्नांवर आवाज उठविण्याचे कबूल केले आणि सदैव आपल्या समाजाच्या पाठीमागे राहील हे सांगितले आणि बीड जिल्हा अध्यक्ष सदस्य व सर्व कार्यकर्ते आणि नाथ बांधव यांचे तोंड भरून कौतुक केले. तर माननीय डॉ योगेश क्षीरसागर भैया यांनी या समाजासाठी बीडमध्ये सभागृहासाठी जागा व उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले यावेळी धाराशिव लातूर जालना छत्रपती संभाजीनगर मुंबई पुणे येथून आलेल्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त केली भाषणापूर्वी जवळजवळ ३० ते ३५ बाल नाथ बांधवांवर नाथ दीक्षाचा कार्यक्रम संपन्न झाला गुरु नारायण कराळे पंढरीनाथ निकम यांनी नाथ बांधवांना दीक्षा दिली या कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील कार्यकारणी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खूप परिश्रम घेतले बीड जिल्हाध्यक्ष भरत चव्हाण यांनी कार्यक्रमाचे नियोजन अतिशय उत्कृष्ट केले त्यांच्या मदतीला रंगनाथ पैठणकर हरिभाऊ भराडी भैरवनाथ शिंदे दत्तात्रय शिराळकर अक्षय बामणे गणेश सावंत बीड जिल्ह्यातील तरुण कार्यकर्ते यांचाही या कार्यक्रमात मोलाचा वाटा होता सदर हाताने मदत करून सर्वजण तन-मन-धनाने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नेमून दिलेले कामे पार पाडून अतिशय यशस्वी कार्यक्रम केला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष यांनी केले होते तसेच सूत्रसंचालन अंजली यादव मॅडम रंजना शिराळकर मॅडम यांनी काव्यमय शैलीत भारदस्त करून कार्यक्रमाची रुची वाढविली शेवटी डवर संबळ तुंनतून श्रीमान शिंदे उत्तम पांचाळ संजय सावंत यांच्या वाद्य गजरात गुरु गोरक्षनाथांचे आरती होऊन महापंगतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तरुण वृद्ध माता भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

पान ६ वरून...

धारूर येथील कब्रस्तानची

स्मशानभुमी अथवा धार्मिक स्थळ नसावेत अशी मुख्य अट आहे. सर्वे नं. ६२२ मध्ये स्मशानभुमी असताना देखील संबंधीत महसुल अधिकाऱ्यांनी व दिलीप हरिनाथ कोमटवार यांनी ही सत्यपरिस्थिती लपवुन ठेवुन भूमी अभिलेख कार्यालय यांचे मार्फत खोटे नकाशे तयार करुन ते दाखल केले व सत्य परिस्थिती लपवुन ठेवुन सर्वे नं. ६२२ मध्ये असलेली स्मशानभुमी न दाखवता अथवा स्मशानभूमी बाबत कोणतीही कागदोपत्री माहिती न देता सदर अकृषी परवाना घेतला आहे. सदर अकृषी परवाना देणेचे पुर्वी सदर मिळकती जवळ स्मशानभूमी असले बाबतचे कागदोपत्री पुरावे दिलीप कोमटवार यांनी संबंधीत महसुल अधिकारी यांचेशी आपसात संगणमत करुन, मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण करुन स्मशानभुमी सर्वे नं. ६२२ मध्ये असताना देखील अकृषी परवाना घेतला आहे. तो परवाना रद्द करणे योग्य, न्यायाचे व जरुरीचे आहे. असे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून म्हटले असून कब्रस्तानच्या जागेचा देण्यात आलेला अकृषी परवाना रद्द करून कब्रस्तान ची जागा परत कब्रस्तानला देण्यात यावी. अशी मागणी असिम सादेक जरगर यांनी आपल्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनावर असीम जरगर यांच्यासह मुबीन मुन्शी शेख, अफरोज मैनोद्दीन पठाण, जमील युसूफ खुरेशी यांची नावे व सह्या आहेत.

मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या ग्राहकांना हक्काचे पैसे मिळणार कधी ?

ज्ञानराधा मल्टीस्टेट व श्रीसाईराम मल्टीस्टेट यांनी जमा केलेल्या ठेवी परत देण्याची नियत दिसेना

किल्ले धारूर । प्रतिनिधी

ऊसतोडकामगारांचा तालुका म्हणून ओळख असणाऱ्या तालुक्यातील सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर व्यवसायिक पेन्शनधारक यांनी रोजच्या दैनंदिन खर्चातून जमा व करून लाखो रुपयांच्या ठेवी शहरातील ज्ञानराधा अर्बन मल्टीस्टेट व श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट च्या शाखांमध्ये जमा केल्या या शाखांमध्ये झालेल्या गैरव्यवाहारामुळे सर्वसामान्य नागरिकांनी ठेवलेल्या ठेवी परत मिळणार की नाही अशा संभ्रमात ठेवीदार आहेत.

कुटे ग्रुप ज्ञानराधा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी कडून तारीख पे तारीख.

श्री साईराम क्रेडिट सोसायटी कडून अधिकृत काहीच माहिती मिळत नाही.

मुलीच्या लग्नासाठी जमा केलेली ठेव न मिळाल्यामुळे लग्न पुढे ढकलावी लागली. पालकांनी मुलांच्या शिक्षणासाठी लागणारा खर्च कसा करायचा पालकां मध्ये चिंता. खरिपाच्या पेरणीसाठी तरी शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा पैसा मिळणार की नाही. मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट २००२ नुसार बँकिंग व्यवसायात खाजगी परवाने मिळतात. खाजगी परवानाधारक मल्टीस्टेट बँकांचे बीड जिल्ह्यामध्ये गल्लीबोळात मल्टीस्टेट बँकेची कार्यालय उघडून राष्ट्रीयकृत बँकांपेक्षा अधिक व्याजदर देऊन ठेविधानांना आपल्याकडे आकर्षित केले या माध्यमातून बँकांकडे लाखो रुपयांच्या ठेवी जमा झाल्या, धारूर शहरांमध्ये ज्ञानराधा मल्टीस्टेट व साईराम अर्बन मल्टीस्टेट यांनी मागील काही वर्षापूर्वी शहरात आपल्या बँकाची कार्यालय उघडून शहरातील व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक शेतकरी व्यवसायिक यांच्याकडून लाखो रुपयाच्या ठेवी जमा केल्या शाखांमध्ये गैरव्यवहार झाल्यामुळे ठेविदारांना पैसा परत करता येत नसल्यामुळे दोन्ही कार्यालय बंद आहेत बँकेच्या खातेदारांना आपले पैसे परत मिळण्याचा कोणताच मार्ग दिसत नसल्याने शासनाने लक्ष घालून ठेवीदारांचे पैसे मिळवून द्यावेत असे सर्व सामान्य खातेदार बोलत आहेत.

व्यवसायातून आलेल्या पैशांमधून काट कसर करून मोठ्या विश्वासाने काही रक्कम ज्ञानराधा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी धारूर शाखेत ठेवीच्या स्वरूपात जमा केली होती मागील काही दिवसापासून शाखा बंद असल्यामुळे जमा केलेली ठेव परत मिळेल की नाही याची चिंता लागून राहिली आहे. व्यवसायामध्ये आर्थिक अडचणी येत आहेत.

अतुल राजहंस, व्यापारी धारूर

मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी मधील ग्राहकांना ठेवी परत मिळत नसतील तर मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी च्या मुख्य कार्यालयात लेखी तक्रार तक्रार करूनही दाद न मिळाल्यास मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी कायदा २००२ व पोलीस स्टेशनमध्ये ४२० चा गुन्हा नोंदवून न्यायालयामध्ये दाद मागण्याचा अधिकार आहे. यात स्थानिक पोलीस यंत्रने पासून ते सि बी आय पर्यंत फिर्याद व अटक करू शकते किंवा वयक्तिक स्वरूपात फिर्याद देता येईल.

ॲड. परमेश्वर शिनगारे पाटील,विधीतज्ञ धारूर,९८६०४१६५६५

जय जवान कनिष्ठ महाविद्यालय कवडगाव (बु.) विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

वडवणी । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या इयत्ता बारावीच्या वर्गाचा निकाल २१ मे २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला असून या मध्ये अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित,जय जवान उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव(बू) ता.वडवणी जि.बीड विद्यालयाचा इ.१२ वी (कला) निकाल -९४.५९% लागला असून १) रोहिणी रमेश लोंढे (प्रथम) - ७९.३३% २)राम बापूराव खरात (द्वितीय) -७७.८३%. ३) हिरवे प्रिया भरत (तृतीय) ७७.८३% ४) राऊत मायावती दिनेश ७५.८३% गुनानुक्रमे उत्तीर्ण झाले असून व सर्व उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेच्या संस्थापिका आदरणीय सुशीलाताई मोराळे मॅडम, संस्थेचे सचिव आदरणीय डॉ. अजीतजी पाखरे साहेब, आदरणीय शिवराजदादा पाखरे साहेब ,संस्थेचे सर्व पदाधिकारी, तसेच गावातील सरपंच,उपसरपंच शिक्षणप्रेमी व मान्यवर पालक वर्ग, विद्यालयाचे प्राचार्य . श्री. सारोक्ते डि.जी व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी इ.१२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्यावतीने मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

सणासुदीच्या काळात कांद्याचे दर वाढणार का? सरकारचं नेमकं नियोजन काय?

सध्या कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आहेत. कारण कांद्याच्या दरात घसरण होताना दिसत आहे. कांद्याचा उत्पादन खर्च निघेल एवढा दरही सध्या कांद्याला मिळत नाही. सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी हटवून देखील दर जैसे थे च आहेत. कारण सरकारनं निर्यातीच्या संदर्भात काही अटी शर्ती घातल्या आहेत. दरम्यान, सणासुदीच्या काळात कांद्याचे दर वाढणार का? असा सवाल उपस्थित केला जातोय. सरकारनं कांद्याचे दर नियंत्रीत राहावे यासाठी योग्य ते नियोजन केलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार यावर्षी कांद्याच्या उत्पादनात घट अपेक्षित आहे. त्यामुळं सणासुदीच्या काळात कांद्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सरकारनं सर्वसमावेशक उपाययोजना सुरु केल्या आहेत. सरकार पाच लाख टनांचा बफर स्टॉक तयार करत आहे. त्यामुळं सणासुदीच्या काळात कांद्याचे दर वाढण्याची शक्यता कमी आहे. कारण जर या काळात कांद्याचे दर वाढले तर सरकार लगेच कांद्याचा बफर स्टॉक बाहेर काढेल, त्यामुळं दर वाढणार नाही, नियंत्रणात राहतील अशी शक्यता आहे.

सरकार करणार ५ लाख टनांचा बफर स्टॉक तयार करण्यासाठी शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करत आहे. मुख्य उत्पादन स्थळांपासून दूर असलेल्या भागात अधिक साठवण केंद्रे तयार केली जात आहेत. सध्या रेडिएशनद्वारे पूर्वीपेक्षा जास्त कांदा साठवला जात आहे. यावेळी उत्पादन क्षेत्रापासून दूर असलेल्या भागात अधिकाधिक कांद्याची साठवणूक करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे गरजेच्या वेळी पुरवठा करणे सोपे होईल अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. सणासुदीच्या काळात वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी जास्त वेळ लागू नये आणि लासलगाव सारख्या मोठ्या बाजारपेठांपासून दूर असलेल्या भागातील ग्राहकांच्या किंमती वाढू नयेत म्हणून वाहतुकीसाठी रेल्वे नेटवर्कचा वापर वाढवण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.

लासलगावमध्ये ५० हजार टन कांदा साठवला जाणार

मिळालेल्या माहितीनुसार मागील वर्षी प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्रातील लासलगाव येथे १२०० टन कांद्याचा साठवणूक करण्यात आली होती. यावेळी सुमारे ५० हजार टन कांदा साठवला जाणार आहे. कांदे ३ ते ४ महिन्यांपेक्षा जास्त काळ साठवले जाऊ शकत नाहीत. कोल्ड स्टोरेजमध्ये देखील २५ टक्क्यांपर्यंत नुकसान होते. रेडिएशन प्रक्रियेवरील नुकसान १० ते १२ टक्क्यांपर्यंत कमी होते.

अवकाळीची झटका, शेतकऱ्यांना फटका

राज्याच्या विविध भागात अवकाळी पाऊस कोसळत आहे. अनेक ठिकाणी पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर काही ठिकाणी शेती पिकांना ( ) मोठा फटका बसल्याचे पाहयाला मिळत आहे. धाराशीव जिल्ह्यात देखील जोरदार पावसानं हजेरी लावलीय. या वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसानं शेती पिकांचं मोठं नुकसान झालंय. या नुकसानीची भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पाहणी केली आहे.

धाराशिवच्या इर्ला गावात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. या नुकसानीचे भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पाहणी केली. पाटील हे बुलेटवरुन शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचल्याचं पाहायला मिळालं. यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पपईच्या बागेच्या नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासमोर नुकसानीबाबतची व्यथा मांडली आहे. धाराशिव जिल्ह्यासह परिसरात अवकाळीमुळे मोठे नुकसान झाले आहे. त्याणुळं लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या बांधावर येत असल्याचं पाहायला मिळालं.

एका बाजूला दुष्काळाच्या झळा, तर दुसऱ्या बाजूला चाऱ्याच्या दराचे संकटं

सध्या राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उष्णतेच्या झळा लागत आहेत, तर कुठं अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. राज्यातील बहुतांश भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढं गेलाय. त्यामुळं नागरिकांना त्रासाला सामोर जावं लागत आहे. अशातच दुसऱ्या बाजूला अनेक ठिकाणी पाणीटंचाईचं संकट निर्माण झालंय. विशेषत: मराठवाड्यात दुष्काळाच्य झळा अधिक तीव्र होताना दिसत आहेत. दुसरीकडं पाणीटंचाईमुळं जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालाय. अशातच जनावरांच्या चाऱ्याचे दर देखील वाढताना दिसत आहेत. त्यामुळं पशुपालक चिंतेत आहेत.

चाऱ्याचे भाव वाढल्याने पशुपालक अडचणीत

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील पशुपालक चिंतेत आहेत. पाणी टंचाईच्या झळांसह आता चारा भाववाढीचे संकट त्यांच्यासमोर आहे. चाऱ्याचे भाव वाढल्याने पशुपालक अडचणीत आले आहेत. मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा तीव्र होताना दिसत आहेत एकीकडे पाणी टंचाई तर दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ही दिवसेंदिवस बिकट होत चालल्याने भाववाढीच्या संकटाला पशुपालकांना सामोरे जावे लागत आहे. कडबा, हिरवा चारा तसेच सरकी पेंडीचे भावही वाढले आहेत. त्यामुळं जनावरं जगवायची कशी? असा प्रश्न पशुपालकांसमोर पडलाय.

कोणत्या चाऱ्यात कीती झाली वाढ? : हिरवा चारा : पहिल्यांदा हिरव्या चाऱ्याच्या १०० पेंड्या १५०० ते १६०० रुपयांना येत होत्या. सध्या यामध्ये मोठी वाढ झालीय. आता हिरव्या चाऱ्याच्या १०० पेंड्या १९०० ते २००० रुपयांना येत आहेत. यामध्ये सध्या ३०० ते ४०० रुपयांची वाढ झाली आहे.

कडबा : कडब्याच्या दरातही वाढ झालीय. पहिल्यांदा कडब्याच्या १०० पेंड्या १६०० ते १७०० रुपयांना येत होत्या. आता यामध्ये वाढ झालीय. आता कडब्याच्या १०० पेंड्या २००० ते २१०० रुपयांना मिळतात. कडब्यातही ३०० ते ४०० रुपयांची वाढ झालीय.

विहीरी आणि बोअरवेलची पाणी पातळी गेली खाली

मागील वर्षी पावसाचं प्रमाण खूप कमी राहीलं होतं. त्यामुळं धरण असेल तलाव असतील यामध्ये पाण्याचा साठा हा कमी प्रमाणात राहिला होता.

तसेच उष्णतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळं विहीरी आणि बोअरवेलची पाणी पातळी देखील खाली गेलीय. तर काही ठिकाणी विहीरी आटल्या आहेत तर बोअरवेल बंद पडले आहेत. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहे. पाणी नसल्यामुळं जनावरांसह त्यांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालाय. जनावरे कशी जगवावीत असा सवाल शेतकरी करताना दिसत आहेत.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १८९६ : निकोलस (दुसरा) रशियाचा झार बनला.
- १९५० : ब्रिटन देशाने पेट्रोलच्या खरेदीसाठी राशन कार्डच्या सक्तीचा कायदा रद्द केला.
- १९८६ : युरोपमधील देशांनी युरोपीय संघाचा झेंडा स्वीकारला.
- १९७१ : बांगलादेशातील सिल्हेट येथे पाकिस्तानी सैन्याने ७१ हिंदूंची कत्तल केली.
- १९७३ : बहारीन देशाने संविधान स्वीकारले.
- १९८९ : मुंबईजवळच्या न्हावा-शेवा बंदराचे उद्घाटन झाले.
- १९९१ : लॉडा एर फ्लाइट ००४ हे बोईंग ७६७ प्रकारचे विमान हवेत असताना थ्रस्ट रिव्हर्सर लागल्याने थायलंडमध्ये पडले. २२३ ठार.
- १९९९ : भारत-पाकिस्तानमध्ये कारगिल युद्धाची सुरुवात.
- १९९९ : श्रीहरिकोटा येथून पी. एस. एल. व्ही. सी. २ या ध्रुवीय उपग्रहवाहकाने भारताचा आय. एस. एस. पी. ४ (ओशनसॅट), कोरियाचा किटसॅट व जर्मनीचा डी. एल. आर. टबसॅट या तीन उपग्रहांना त्यांच्या कक्षेत यशस्वीरीत्या पोहोचवले.
- २००७ : भारत आणि जर्मनी देशांतर्गत सुरक्षा संबंधी करार करण्यात आले.
- २०१४ : नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १४७८ : पोप क्लेमेंट सातवा.
- १५६६ : महमद तिसरा, ओट्टोमन सम्राट.
- १६६७ : फ्रेन्च गणिती अब्राहम डी. मुआव्हर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १७५४)
- १७९९ : अलेक्सांद्र पुश्किन, रशियन लेखक.
- १८६७ : टेकची मेरी, पंचम जॉर्जची राणी.
- १८८५ : नाटककार, कवी व विनोदी लेखक राम गणेश गडकरी यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९१९)
- १९०२ : नाटककार व साहित्यिक सदाशिव अनंत शुक्ल ऊर्फ कुमुदबांधव यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १९६८)
- १९०६ : बेंजामिन पिअरी पाल, भारतीय कृषी वैज्ञानिक व संशोधक.
- १९०७ : जॉन वेन, अमेरिकन अभिनेता.
- १९०८ : न्विन न्गॉक थो, दक्षिण व्हियेतनामचा पंतप्रधान.
- १९०९ : आदोल्फो लोपेझ मटियोस, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
- १९१२ : यानोस कादार, हंगेरीचा पंतप्रधान.
- १९३० : भारतीय-ईराणी भाषेतील शब्दलेखक आणि समीक्षक करीम इमामी यांचा जन्म. (मृत्यू: ९ जुलै २००५)
- १९३७ : भारतीय अभिनेत्री आणि गायक मनोरमा यांचा जन्म. (मृत्यू: १० ऑक्टोबर २०१५)
- १९३८ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता बी. बिक्रम सिंग यांचा जन्म. (मृत्यू: १२ मे २०१३)
- १९४५ : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री विलासराव देशमुख यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑगस्ट २०१२)
- १९४६ : प्रख्यात भारतीय राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्या तसचं, मजदूर किसान शक्ती संघटनेच्या संस्थापिका अरुणा रॉय यांचा जन्मदिन.
- १९४९ : हँक विल्यम्स जुनियर, अमेरिकन संगीतकार.
- १९६१ : भारतीय-अमेरिकन दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक तारसेम सिंग यांचा जन्म.
- १९६६ : झोला बड, दक्षिण आफ्रिकेची धावपटू.
- १९६८ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन अभिनेते, तसचं, दूरदर्शन विनोदी मालिका तारक मेहता का उलटा चश्मा या विनोदी मालिकेतील प्रख्यात कलाकार दिलीप जोशी यांचा जन्मदिन.
- १९८३ : अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेल रत्न, पद्मश्री, सीएनएन-आयबीएन इंडियन ऑफ दी इयर स्पोर्ट्स तसचं, सन २००८ साली झालेल्या उन्हाळी ऑलिंपिकमधील कुस्ती पुरुष फ्रीस्टाईल लाइटवेट पदक विजेता सुप्रसिद्ध भारतीय फ्री स्टाईल कुस्तीपटू सुशील कुमार सोलंकी यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १७०३ : विख्यात इंग्रजी रोजनिशीकार व कुशल प्रशासक सॅम्युअल पेपिस यांचे निधन. (जन्म: २३ फेब्रुवारी १६३३)
- १९०२ : अमेरिकन संशोधक अल्मोन स्ट्राउजर यांचे निधन. (जन्म: ११ फेब्रुवारी १८३९)
- १९०८ : अहमदिया पंथाचे संस्थापक मिर्झा गुलाम अहमद यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी १८३५)
- १९७२ : सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेत्री राजलक्ष्मी यांचे निधन.
- २००० : प्रभाकर शिरुर, चित्रकार.
- २००० : अर्थतज्ञ व लेखक, मराठी भाषेतील पहिल्या अर्थविषयक नियतकालिकाचे संपादक श्रीपाद वामन काळे यांचे निधन.
- २०१४ : भारतीय राज्य केरळमधील पठाणमथिट्टा जिल्ह्यातील मालंकारा ऑर्थोडॉक्स सिरियन चर्च चे धर्मगुरू कॅथोलिक बेसीलिओस मार थोमा डिडिमॉस पहिले यांचे निधन.
- २०१७ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय पोलीस सेवा अधिकारी आणि पंजाब राज्याचे माजी पोलीस महासंचालक कंवर पाल सिंह गिल यांचे निधन.

कोकण, मराठवाड्यासह विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता

मुंबई : राज्यासह देशात सध्या ऊन-पावसाचा खेळ पाहायला मिळत आहे. कुठे उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. तर कुठे अवकाळी पावसाचा तडाखा बसताना दिसत आहे. पुढील काही दिवस महाराष्ट्रात काही भागात जोरदार पावसाची शक्यता पाहायला मिळणार आहे. कोकण, मराठवाड्यासह विदर्भात पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. या व्यतिरिक्त इतर भागात उष्णतेच्या झळा बसण्याची शक्यता असून काही ठिकाणी तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअस वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाचा अंदाज काय सांगतो?

दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्र जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी , उत्तर कोंकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

यावेळी ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा पाहायला मिळणार असून हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे.

विदर्भात पावसाचा जोर कायम

गेल्या आठवड्याभरापासून राज्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने अक्षरक्ष: झोडपून काढलं आहे. राज्यात एकीकडे तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना विदर्भात सलग आठवडाभर पावसाची हजेरी लागताना दिसत आहे. पुढील तीन दिवसही विदर्भातील सर्व जिल्ह्यांना हवामान विभागाकडून अवकाळी पाऊस, विजांच्या कडकडासह ३०-४० किमी प्रति तास सोसाट्याच्या वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे.

फ्लॉवर पिकांमधील गड्डा सड रोग

महाराष्ट्रात फ्लॉवर हे एक महत्त्वाचे भाजीपाला पीक आहे, ज्याची लागवड सुमारे १६,००० हेक्टरवर होते. नाशिक, नगर आणि पुणे हे या पिकाचे प्रमुख उत्पादक जिल्हे आहेत. फ्लॉवर पिकांमध्ये अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो, त्यापैकी गड्डा सड हा एक प्रमुख रोग आहे. हा रोग पानांवर आणि गड्ड्यांवर दिसून येतो आणि त्यामुळे पिकाचे मोठे नुकसान होते. लक्षणे: सुरुवातीला जुन्या पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसून येतात. हळूहळू हे ठिपके अर्धा इंचापर्यंत वाढू शकतात आणि एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. कालांतराने नवीन पानांवरही हे ठिपके दिसून येतात आणि पाने वाळून गळून पडतात. फ्लॉवरच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसू लागतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो.

रोगाचे कारण: हा रोग अल्टरनेरिया ब्रासिसिकोला नावाच्या बुरशीमुळे होतो. हा रोग बीजाणूंद्वारे बियाणे, जमीन आणि पिकांच्या अवशेषांमधून पसरतो. आर्द्रता आणि तापमान: ८५ ते ९० टक्के आर्द्रता आणि २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान या रोगासाठी अनुकूल आहे. इतर घटक: पाण्याचा ताण, अन्नद्रव्यांची कमतरता, किडींचा प्रादुर्भाव यामुळेही रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

रोगाची लक्षणे: पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसतात जे एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. हळूहळू ठिपके वाढून पान पूर्णपणे वाळून जाते. फ्लॉवरच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसून येतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो.

नुकसान: या रोगामुळे साधारणतः १० ते ४० टक्क्यांपर्यंत पिकाचे नुकसान होऊ शकते. अन्य यजमान पिके: कोबी, चायना कोबी, ब्रोकोली, बृशेल, मोहरी. नियंत्रणाचे उपाय: प्रतिबंधात्मक उपाय: प्रमाणित बियाण्यांचा वापर. बियाण्यांना बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया. पीक फेरपालट. योग्य जलव्यवस्थापन. संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन. किडींचा नियंत्रण. रोगग्रस्त पाने आणि गड्डे त्वरित नष्ट करणे. रोगप्रतिकारक उपाय: शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर. जैविक बुरशीनाशक जसे की ट्रायकोडर्मा व्हिरीडीचा वापर. टीप: शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर तज्ञांच्या सल्ल्यानेच करावा. रोगाचा प्रादुर्भाव दिसल्यास ताबडतोब कृषी तज्ञांचा सल्ला घ्या.अतिरिक्त माहिती: अधिक माहितीसाठी आपण आपल्या वळच्या कृषी विद्यापीठ किंवा कृषी विज्ञान केंद्राचा संपर्क साधू शकता.

अखेर मांजरा धरणाने मृत साठ्याची पाणी पातळी गाठली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरासह बीड-लातुर- उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या ''मांजरा'' धरणातील पाणी साठ्याने आता मृत साठ्याची पाणी पातळी ओलांडली आहे. २२४.०९३ दलघमी साठवण क्षमता असलेल्या या धरणात आजच्या तारखेला फक्त ४७.१३० दलघमी. एवढाच पाणी साठा शिल्लक आहे. या धरणाच्या घशाला आता कोरड निर्माण होवू पहात आहे. त्यामुळे या धरणावर पाणी पुरवठा अवलंबुन असलेल्या गावांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

बीड-लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील कांही गावाच्या पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न सोडवण्यासाठी १९७१ साली मंजुर करण्यात आलेले मांजर धरण दोन वर्षानंतर पुन्हा एकदा मृत साड्यांच्या खाली गेले आहे. जागतिक ग्लोबल वॉर्मिंग नंतर या विभागातील गेली अनेक वर्षांचा पावसाचा अभ्यास असा सांगतो की मृग नक्षत्रात जरी ७ जून रोजी सुरुवात होत असली तरी मोठ्या पावसास जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच सुरुवात होते. याचाच दुसरा अर्थ असा की मांजरा धरण शुन्य पातळीच्या वर येण्यास किमान ऑगस्ट महिन्याची तरी वाट पहावी लागणार आहे. तोपर्यंत या सर्व गावांना शुन्य पातळी खालील गाळ मिश्रीत पाणी पिण्यासाठी वापरावे लागणार आहे.

मांजरा धरणातील पाणी पातळीवर सातत्याने नजर ठेवून असणारे मांजरा धरणाचे शाखा अभियंता सुरज निकम यांनी मांजरा धरण शुन्य पातळीच्या खाली गेल्याची अधिकृत माहिती दिली आहे. सध्या बीड लातुर आणि उस्मानाबाद या तीन ही जिल्ह्यात उन्हाची

प्रचंड तीव्रता जाणवत आहे. स्वाभाविकच उन्हाची तीव्रता कमी करण्यासाठी पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या विभागातील पाणी पातळीवरही मोठा परिणाम जाणवतो आहे. या विभागातील लहान मोठ्या तलावातील पाणीसाठा संपलेलाच आहे शिवाय पारंपारिक विहीरी, बोअरवेल ची पाणी पातळी ही खुप खोल गेली आहे. अनेक विहिरी व बोअरवेल कोरडे पडत चालल्याची माहिती दररोज नव्याने समोर येत आहे. अशा सर्व परिस्थितीत बीड लातुर उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील शेकडो गावात साधारणतः हीच परिस्थिती आहे. त्यामुळे या गावातील भाकड जनावरे, माणसांसाठी लागणारे पाणी पुरवण्याची जबाबदारी मांजरा धरणावर व संबंधित यंत्रणांवर येवून ठेपली आहे. मांजरा धरणात आज अधिकृत माहिती नुसार ६४२.३७ मीटर पाणी पातळी आता ६३५.७२ मीटरवर येवून पोहोचली आहे. तर २२४.०९३ दलघमी पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात आता फक्त ४७.१३० दलघमी एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा धरणाची शून्य पाणी पातळी ४७.१३० असून आज दिनांक २५ मे २०२४ रोजी मांजरा धरणाने ही शुन्य पाणीपातळी गाठली आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे मांजरा धरणातील पाण्याचे बाष्पीभवनाव्दारे पाणी कमी होण्याचे प्रमाण ही मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. एरवी धरणातील पाण्याचे बाष्पीभवनाचे प्रमाण ०.१११ एमक्युम असते तर आता हे प्रमाण ८.४० एम एम पर्यंत जाऊन पोहोचले आहे. या वाढत्या पाणी बाष्पीभवनाचा परिणाम ही पाणीसाठा कमी होण्यावर होणार आहे. मराठवाड्यातील बीड, लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील सिंचनाचा आणि पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी सोडवण्यासाठी १९७१ साली तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी बीड लातुर आणि उस्मानाबाद जिल्हायाच्या सीमा रेषेवरील मांजरा धरणाच्या मंजुरीस मान्यता दिली. या धरणाच्या निर्मिती मुळे बीड, लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील ७३ गावांचा या धरणाच्या लाभक्षेत्रात समावेश झाला तर १२ गावांचे स्थलांतर या धरणाच्या निर्मिती पुर्वी करावे लागले होते.

१९७१ साली मंजुरी मिळाल्यानंतर जवळपास ६१६०.४० लक्ष रुपये खर्च करुन या धरणाची निर्मिती करण्यात आली. १९७१ साली या धरणाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आल्या नंतर १९७८-७९ साली या धरणाची कंदरभरणी करण्यात आली तर १९८१ साली या धरणाचे काम पुर्ण करण्यात आले. मांजरा धरणाच्या निर्मिती नंतर जवळपास ३० वर्षाच्या कालावधीत या धरणक्षेत्रात येणा-या अनेक गावांचा कायापालट झाला. या धरणामुळे अनेक ओसाड गावे भरघोस उत्पादन देणाऱ्या पीकांचे गाव (ग्रीन बेल्ट) म्हणून ओळखल्या जावू लागली होती. २०११ पर्यंत या धरणात सतत मुबलक पाणी पुरवठा राहिला. मात्र २०११ नंतर या विभागात सतत अल्प प्रमाणात होणाऱ्या पावसामुळे या विभागावर पाण्याचे संकट ओढवण्यास सुरुवात झाली. २०११ साली या विभागात जास्त पावूस झाल्यामुळे या धरणाचे चार दरवाजे उघडावे लागले होते, त्यानंतर मात्र या भागात पावूसच झाला नाही. २०११ साली व त्यानंतर झालेल्या अल्प पावसात बीड, लातुर उस्मानाबाद या तीन जिल्ह्यात अनेक गावांची तहान या वर्षीच्या मार्च अखेर पर्यंत मांजरा धरणाने भागवली. २०११ नंतर साधारणपणे प्रत्येक पाच वर्षात फक्त एकदा मांजरा भरण्याईतपत पावूस या धरण क्षेत्रात होवू लागला. आठ वर्षांपूर्वी २०१६ साली जुलै महिना संपत आला २२४.०९३ दलघमी. पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात पाण्याचा एक टिपूस ही नव्हता. १९८१ साली या धरणाचे काम पुर्ण झाल्यानंतर प्रथमच आठ वर्षापुर्वी हे धरण कोरडेठक्क पडले होते. त्यावर्षी जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या धरणक्षेत्रात एक आठवडा तुफान पावूस झाला आणि धरण ओसांडून लागले होते. आजही या विभागात वेगळी परिस्थिती नाही. आज धरणातील पाण्याने शुन्य पातळी गाठली असतांना २०१६ च्या धरणाच्या स्थितीची आठवण येणे स्वाभाविक आहे. मागील वर्षी मोठा पावूस नसल्यामुळे यावर्षी मांजराने पुन्हा आपला तळ उघडा करण्यास सुरुवात केली आहे. आणि मांजरा धरणाच्या घशाला आता कोरड पडण्यास सुरुवात झाली आहे. राज्यातील कमी पाऊस पडणाऱ्या व पाणी पातळी कमी असणारा २ लाख ५० हजार चौमी किमी क्षेत्राला वाळवंटी होण्याचा धोका राज्यातील अनेक अभ्यासकांनी यापुर्वी नोंदवलेला आहे. या संदर्भात नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात आणि पाहाणी अहवालाने ही राज्यातील २ लाख ५० हजार चौकिमी क्षेत्राची वाळवंटीकरणाची वाटचाल करीत आहे असे म्हटले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील बीड लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांची गेली अनेक वर्षापासून सतत चर्चा होत असते. तरीही राज्य शासनाने गेली ५० वर्षात या तीन जिल्ह्यांचा भूजल स्तर वाढविण्यासाठी विशेष तर सोडाच पण सीधे-साधे प्रयत्न केल्याचेही ऐकिवात नाही वा प्रत्यक्षात दिसून येत नाही. ही बाब अतिशय संतापजनक आहे. ही सर्व परिस्थिती पुढील काळात पिण्याच्या पाण्याचे काय होईल.

कागदी मेळ घालण्यात गटविकास अधिकारी तरबेज

पाणी धर्माला ''कलंक'' लावणाऱ्या पंचायत समितीचीम्या भ्रष्ट यंत्रणेला कुणाचे अभय ?

गेवराई । प्रतिनिधी

जिल्ह्यात दुष्काळी चित्र असल्याने, गेल्या दोन महिन्यांपासून जिल्हा प्रशासनाकडून ग्रामीण भागात पाणी पुरवठा केला जात असून ; गेवराई पंचायत समितीचा पुरवठा विभाग कागदी मेळ घालून ग्रामीण भागातील जनतेची फसवणूक करीत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. टॅन्करच्या माध्यमातून होत असलेल्या फेऱ्या नियमांनुसार न टाकता, फेऱ्या मध्ये हातचलाखी केली जात आहे. त्यामुळे, पाणी धर्माला ''कलंक'' लावणाऱ्या पंचायत समितीचीम्या भ्रष्ट यंत्रणेला कुणाचे अभय ? असा खडा सवाल उपस्थित केला जात आहे.दरम्यान, गेवराई पंचायत समितीचा पाणी पुरवठा विभाग, गट विकास अधिकारी श्रीमती मिना काबळे यांच्या छत्रछायेखाली पाणी टंचाईच्या माध्यमातून टॅन्करच्या नळाखाली हात ओले करून घेत असल्याची चर्चा असून, या संदर्भात विभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यात, गेल्या वर्षीच्या मोसमी हंगामात पावसाने ओढ दिल्याने, फेब्रुवारी २०२४ च्या पहिल्याच आठवड्यात ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागले होते. पाणी टंचाई निर्माण झाल्याने, पाण्यासाठी नागरीकांना वणवण भटकंती करून, तहान भागवावी लागली आहे. त्यामुळे, जिल्हा प्रशासनाने तातडीने उपाय योजना करून, जिल्ह्यातील ग्रामीण भागात टॅन्करनेपाणी पुरवठा सुरू केला. गेवराई नगर परिषदेच्या जलकुंभातून ग्रामीण भागात शुद्ध पाणी टॅन्करमध्ये भरले जात असून, आमदार लक्ष्मण पवार यांच्या दूरदृष्टीतून, पैठण नाथ सागराची पाणी पुरवठा योजना ग्रामीण भागासाठी उपयोगी आली आहे.गेवराई तालुक्यातील ७८ गावात, १२० टॅन्कर द्वारे पाणी पुरवठा केला जात असून, एक दोन ठिकाणी विहिर अधिग्रहण करण्यात आली आहे. त्या विहिरीतूनसंबंधित गावांना टॅन्करच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जात आहे.मात्र, नियमानुसार टॅन्करच्या फेऱ्या होत नाहीत. पंचायत समितीच्या पाणी पुरवठा विभागाच्या दप्तरी रितसर नोंद करून, टॅन्कर नेमून दिलेल्या ठिकाणी पाठवले जात आहे. वास्तविक पाहता, जिथे दोन फेऱ्या तिथे एकच फेरी टाकून, दप्तरी दोन फेऱ्यांची नोंद केली जात असून, याच पद्धतीने फेऱ्या मध्ये हातचलाखी केली जात आहे. पंचायत समितीचा पाणी पुरवठा विभाग, पाणी पुरवठा करणाऱ्या टेन्डर धारकांना कागदोपत्री मदत करत आहे. कागदी मेळ घालून फेऱ्या दाखविल्या जात आहेत. या संदर्भात, ग्रामीण भागातील नागरिकांनी तोंडी तक्रारी केल्या आहेत. परंतू , या तक्रारीकडे बीडीओ श्रीमती कांबळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून, टॅन्करचा पाणी घोटाळा उघडकीस आणावा, अशी मागणी होऊ लागली आहे.श्रीमती मिना कांबळे यांच्या कडे तक्रार घेऊन आलेल्या नागरिकांना नीटपणे उत्तरे दिली जात नाहीत. त्या उगीचच चिडचिड करून, तक्रार करणारांवर अप्रत्यक्ष दबाव टाकतात. ओरडून बोलतात. पंचायत समितीच्या अंतर्गत येणाऱ्या फाईल्स वर सही न करणे, त्या रोखून धरने, ग्रामीण भागातील नागरिकांच्या प्रश्नाकडे करणे, विशिष्ट लोकांना थेड केबिन मध्ये बोलावून फाईल्स निकाली काढण्या संदर्भातली त्यांची भूमिका संशयास्पद असल्याची चर्चा असून, हेतू ठेवून काही फाईल्स वर बीडला येऊन सही घ्या, असा आदेश कर्मचाऱ्यां मार्फत पोहचवला जात असल्याची चर्चा आहे.

चिंचोटीच्या सरपंचांनी वादळग्रस्तांना दिला मदतीचा हात

चक्रीवादळ नुकसानग्रस्तांच्या मदतीला गेले धावून

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी परिसरात काल रात्री अचानक चक्रीवादळ येऊन धडकल्याने काही कळण्याच्या आत अर्ध्या गावच्या घरावरील पत्रे उडाली गरिबाचा संसार उघड्यावर आल्याने चिंचोटी गावचे सरपंच भागवत बापू गोंडे यांनी कार्य तत्परता दाखवत चक्रीवादळग्रस्तांच्या मदतीला धावून आले आणि प्रशासन लावले कामाला त्यांच्या या धडाकेबाज कामगिरीची वडवणीतालुक्यात दिवसभर चर्चासविस्तर वृत्त असे की चिंचोटी परिसरात काल रात्री अचानक चक्रीवादळ येऊन धडकल्याने चींचोटी ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही परंतु अनेकांच्या घरावरील पत्रे उडाल्याने गरीबाचा संसार मात्रउघड्यावर आलेला आहे अन्नधान्यभिजून गेले.संसार उपयोगी साहित्य वाऱ्याने इतरत्र पसरल्याने अंधारातच बऱ्याच वेळ ग्रामस्थांची शोधाशोध चालू होती अनेकांच्या घरावरील पत्रे बाजूच्या शेतामध्ये दूर पर्यंत जाऊन पडली होती अंतराया पांगराची पूर्ण कपडे भिजल्याने अनेकांनी मंदिरातच जागून रात्र काढली अनेकाणी ठिकाणी विद्युत तारेचे पोल कोलमडून पडले विद्युत तारा रस्त्यावर लोळू लागल्या मोठमोठी झाडे वाऱ्याने उन्हाळून पडली अशा भयंकर वादळी परिस्थितीमध्येअनेकांनी आपला जीव मुठीत धरून लेकरा बाळा सह खाटाखालीजाऊन दडले. वादळ शांत झाल्यानंतर चिंचोटी गावचे सरपंच भागवत बापू गोंडे यांनी नुकसानग्रस्तांच्या घरी भेटी देऊन अनेकांना धीर दिला झालेल्या नुकसानीचे वृत्तप्रशासनाला कळवून नुकसानग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदतीची मागणी केली सकाळी सकाळी प्रशासनाचे अधिकारीवर्ग पंचनामे करण्यासाठी दाखल झाल्याने भागवत बापू गोंडे यांच्या कार्याचं कौतुकगावकऱ्यांनी तोंड भरून केले. वडवणी तहसील प्रशासनाच्या वतीने पंचनामे करण्यासाठी तलाठी बिरले ग्रामसेवक सत्यवान काशीद उपसरपंच गोविंद गोंडे ग्रामपंचायत सदस्य केशव काकडे ,साहेबराव गोंडे, ग्रामपंचायत कर्मचारी आणि गावातील केशव गोंडे रामेश्वर गोंडे बप्पा कांबिलकर माऊली काकडे इतर मान्यवर उपस्थित होते

अचानक चक्रीवादळ धडकल्यानेअनेक घरांची पडझड झालेली आहे संसार उपयोगी साहित्य खराब झाले अन्नधान्य भिजले आहे डोक्यावरचे छप्पर उडाल्यानेअनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत अशा नुकसानग्रस्तांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी अन्यथा रस्त्यावर उतरून लोकशाही पद्धतीने आंदोलन करणार

प्राचार्य डॉ. गाढवे यांचे निधन

गेवराई । प्रतिनिधी

येथील र भ अट्टल महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ मारोतीराव गाढवे यांचे पुणे वाकड येथे अल्पशा आजाराने शुक्रवारी सकाळी आठ वाजता निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्यूसमई त्यांचे वय ७५ वर्ष होते.त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी अट्टल कॉलेज, सुंदरराव सोळुंके कॉलेज माजलगाव येथेही प्राचार्य म्हणून उत्तम काम केले. ते बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात व्यवस्थापन समितीचे सदस्य होते. प्राचार्य गाढवे यांचा स्वभाव शांत संयमी मितभाषी होता. अत्यंत विद्यार्थिप्रिय शिक्षक शिस्तप्रिय प्रशासक होते.त्यांनी गेवराईत मोठा संपर्क ठेवला होता. प्राचार्य गाढवे सर यांच्या जाण्याने शिक्षण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

एमएस क्लासेस म्हणजे विद्यार्थी घडविण्याचे केंद्र- प्रा. काकडे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी सारख्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांमध्ये उच्च गुणवत्ता निर्माण करणारे एम एस कोचिंग क्लासेस म्हणजे विद्यार्थी घडविणारे केंद्र आहे असे मत प्रा.श्रीनिवास काकडे यांनी बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी व्यक्त केले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या एच एस सी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे यामध्ये एम एस कोचिंग क्लासेस वडवणीच्या विद्यार्थ्यांनी बायोलॉजी. फिजिक्स मॅथ आणि केमिस्ट्री या विषयांमध्ये१०० पैकी ९९ पर्यंत गुण मिळवून भरघोस यश मिळवले ९५ ते ९९या दरम्यान गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते एम एस कोचिंग क्लासेसची विद्यार्थिनी मुंडे लक्ष्मी मॅथ

विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवले .बायोलॉजी याविषयात१०० पैकी ९७ गुण मिळवले.अविनाश मस्के मॅथ ९८.सवाल के प्रीती ९६.सावंत भाग्यश्री ९६ व यादव श्याम बाला बायलॉजी ९५.विवेक होंडे बायलॉजी ९४असे भरघोस गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला या विद्यार्थ्यांना प्रा. सावंत सर.प्रा. गवारे सर प्रा. मरळकर सर प्रा. मुंडे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. श्रीनिवास काकडे.बागडे सर आणि इतर मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेया कार्यक्रम प्रसंगी प्रा. श्रीनिवास काकडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की या क्लासेस नअत्यंत कमी कालावधीमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करून दाखवली आहे या जीवघेण्या स्पर्धेमध्ये वडवणी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा योग्य मार्गदर्शन मिळाले तर मागे राहत नाही.इथून पुढेविज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना इतरत्र कोठेही क्लासेस ला जायची गरज नसून लातूर औरंगाबाद नांदेड सारखे उच्च गुणवत्तेचे शिक्षण वडवणी मध्ये मिळत असल्याने समाधान व्यक्त करून शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मरळकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन गवारे सर यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मुंडे सर सावंत सर आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

चितपट कुस्त्यांनी फिटले शौकिनाच्या डोळ्याचे पारणे

संग्राम पाटील विरुद्ध सुदर्शन कोतकर यांच्यात रंगली दोन लाखाची कुस्ती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा समजल्या जाणाऱ्या कडा येथील जागृत देवस्थान हजरत मौलाली बाबा यात्रा उत्सवानिमित्त शुक्रवारी चितपट कुस्त्यांचा जंगी सामना कुस्ती प्रेमींना पहावयास मिळाला.महाराष्ट्राचा रांगडा खेळ समजल्या जाणाऱ्या कुस्तीच्या डावप्रतिडावाने शौकिनांच्या डोळ्याचे पारणे फेडले. या आखाड्यात शेवटची कुस्ती दोन लाख रुपयांची संग्राम पाटील विरुद्ध सुदर्शन कोतकर यांच्यामध्ये झाली. या कुस्तीचा दोन लाख रुपयांचा इनाम आमदार सुरेश धस यांनी स्वतः देऊन दोन्हीही मल्लांचा गौरव केला.

हालगीचा आवाज , प्रेक्षकांची तुफान गर्दी, आडदांड मल्लाची उपस्थिती दोन दोन मिनिटाला चितपट होत असलेल्या कुस्तीने खरोखरच कुस्ती शौकिनाच्या डोळ्याचे पारणे फिटले असल्याचे कडा येथील ग्रामदैवत मौलाली बाबा यात्रोत्सवानिमित्त पहावयास मिळाले. यावर्षी प्रथमच कडा गावातील उच्च पदस्थ अधिकारी असलेल्या भूमिपुत्रांनी १२ कुस्त्या ह्या महाराष्ट्रातील नामवंत मल्लांच्या ठरवून लावलेले होत्या. या कुस्त्यांचे बक्षिसेही त्याच भूमिपुत्रांनी दिली.एकूण

कडा येथील यात्रा ही संपूर्ण आष्टी तालुक्यामधील सर्वात मोठी यात्रा म्हणून समजली जाते यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा मोठा आखाडा भरविला जातो यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत मल्लांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती तसेच यावर्षी आमदार सुरेश धस हे सुरुवातीपासून शेवटपर्यंत कुस्त्या पाहण्यासाठी थांबले. एवढेच नव्हे तर चक्क त्यांनी आज या कुस्तीच्या आखाड्यामध्ये समलोचकाची भूमिका चोखपणे पार पाडली.

सात लाख रुपये ईनाम म्हणून पहिलवानास वाटप करण्यात आले. आष्टी तालुक्यातील कडा येथील सर्व धर्म समभावाचे प्रतिक म्हणून असलेल्या मौलाली बाबा यात्रेला बौद्ध पोर्णिमा पासुन सुरवात झाली आहे. याच यात्रेनिमित्त शुक्रवारी सायंकाळी जंगी कुस्ती सामने रंगले. नगर, पुणे, करमाळा, बीड, पाथर्डी, आष्टी, कोल्हापूर,सांगली,सातारा अकलूज यासह अनेक ठिकाणावरून आलेल्या मल्लांनी शौकिनांना खुष केले. दंवडीची कुस्ती ही दोन लाख रुपयांची बरोबरीत सोडुन आखाडा संपवला. यावेळी आ.बाळासाहेब आजबे,माजी आमदार भीमराव धोंडे,डीवायएसपी मंदा घोगरे ,जयदत्त धस,महाराष्ट्र केसरी सइद चाऊस,सरपंच युवराज पाटील,उपसरपंच बाळासाहेब कर्डीले , सभापती रमजान तांबोळी,अनिल ढोबळे,आण्णासाहेब नाथ, योगेश भंडारी,संभाजी कर्डीले,,राम मधुरकर, बबलू पानसरे,संजय ढोबळे,संपत सांगळे,बाळासाहेब कर्डीले,सचिन घावटे,महेश मस्के,तानाजी करडीले ,राजबापू करडीले,किरण काळे,राजाभाऊ देवकाते,भाऊसाहेब भोजने,बंडा सय्यद,गौतम करडीले ,अनिल शिंदे,मोहमद सय्यद,बाळासाहेब देशमुख,छगन करडीले,सागर खेडकर,राजू साळवे,आरिफ शेख,सर्व ग्रामपंचायत सदस्य, यात्रा कमिटी सदस्य आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी सपोनि संतोष खेतमाळस,पोलीस उपनिरीक्षक विजय नरवाडे सह कडा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.

यावर्षी कडा येथील मौलाली बाबा यात्रेस मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून कुस्त्या पाहण्यासाठी प्रेक्षकांना स्टेडियमची उभारणी केली होती.दुपारी चार ये रात्री नऊ वाजेपर्यंत कुस्त्यांचा आखाडा रंगला होता. दूरवरून आलेले खेळणीचे दुकाने रहाट पाळणे व इतर दुकानांसाठी सरपंच युवराज पाटील यांनी मोठ्या प्रमाणात जागेची साफसफाई करून जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवसायिकांची अडचण झाली नाही.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व गेवराई पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे सर विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांच्या आदेशाने विभागीय उपाध्यक्ष जेष्ठ पत्रकार सुनील पोपळे व जिल्हा उपाध्यक्ष सुनील मुंडे यांचे अध्यक्षतेखाली गेवराई तालुका कार्यकारणी जाहीर झाली. यावेळी सर्वानुमते तालुका अध्यक्ष म्हणून परत एकदा अंकुश आतकरे यांच्यावर जिम्मेदारी सोपवण्यात आली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, शाखा गेवराई व गेवराई पत्रकार संघ गेवराई या दोन्ही पत्रकार संघाची कार्यकारणी दि. २२ मे रोजी ज्येष्ठ पत्रकार तथा विभागीय उपाध्यक्ष सुनील पोपळे व जिल्हा उपाध्यक्ष सुनील मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सर्वानुमते बिनविरोध अध्यक्ष म्हणून अंकुश आतकरे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष भागवत देशपांडे राजेंद्र नाटकर, सचिव तुळशीराम वाघमारे, शहराध्यक्ष कैलास हादगुले, कार्याध्यक्ष अनिल अगुंडे, कोषाध्यक्ष शिवनाथ काळे, सहकार्य अध्यक्ष सुदर्शन देशपांडे, सहकोषाध्यक्ष अरविंद कुलकर्णी तर सदस्य रामहरी काकडे, मधुकर फुले, आर.के.

थोरात, सचिन नाटकर, गणेश वीर यांच्या निवडी करण्यात आल्या. याप्रसंगी नूतन तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे म्हणाले की, माझ्यावर परत एकदा तुम्ही जिम्मेदार टाकत मला अध्यक्ष केल्याने माझ्या पण जिम्मेदा-या आणखी वाढले आहेत. मी आजवर आपल्या संघातील सर्व पत्रकारांच्या अडीअडचणीला सामोरे जात होतो यापुढेही जाणार परंतु विशेषतः मी ग्रामीण भागातील पत्रकारांना जास्त प्राधान्य देणार असुन आपल्या संघाचे नाव लौकिक करण्यासाठी सदैव प्रयत्न करणार व सामाजिक कार्यात अग्रेसर राहणार आपल्या संघाच्या माध्यमातून अनेक आडल्या नडल्यांची कामे करणार व त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार असे ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ पत्रकार सुनील पोपळे यांनी तर सूत्रसंचालन तुळशीराम वाघमारे व आभार प्रदर्शन सुनील मुंडे यांनी केले.

पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था

पालखीमार्ग नव्हे मोक्ष मार्ग; जन आंदोलनाचा इशारा –डॉ.गणेश ढवळे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातुन जाणाऱ्या पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ पालखीमार्गाची दुरावस्था झाली असुन केशव आघाव यांच्या तिरूपती कन्स्ट्रक्शन मार्फत करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जागोजागी खड्डे आणि भेगा पडल्या असुन दुचाकी वाहनांचे टायर भेगा मध्ये अडकुन वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.पाटोदा ते घुमरा पारगाव दरम्यान रंदवेवस्ती याठिकाणी मोठ्या प्रमाणावर पडलेल्या भेगा मध्ये वाहनांचे चाक अडकून अपघात होत असताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व जिल्हा प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत आहेत. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हमीद खान पठाण, शेख जावेद, राहुल जाधव (राष्ट्रीय काँग्रेस तालुकाध्यक्ष), मुकुंद शिंदे शिवसेना (उबाठा)



तालुकाध्यक्ष आणि विविध सामाजिक संघटना यांच्या निवेदन, आंदोलनानंतर थातुरमातुर डागडुजी करण्यात आली होती.परंतु पुन्हा त्याठिकाणी भेगा पडलेल्या आहेत.या रस्त्याचे भिमनगर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच मांजरा नदीवरील पुल , पारगाव,अनपटवाडी,चुंबळी फाट,मळेकरवाडी घाट याठिकाणचे काम अर्धवट अवस्थेत असुन ठेकेदार पळुन गेला आहे. संबंधित प्रकरणात कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यात येऊन रखडलेली कामे पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी नितीन गडकरी, अरविंद काळे,प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना निवेदनाद्वारे केली असुन आचारसंहिता संपल्यानंतर सामाजिक संघटना व सर्वपक्षीय जन आंदोलनाचा इशारा दिला आहे.

नितिन गडकरी यांच्या आदेशानंतर उखडलेला रस्ता पुन्हा करण्यात आला होता

पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम ४-५ वर्षांपासून रखडलेले असुन ३ वर्षांपूर्वी पाटोदा तालुक्यातील अनपटवाडी येथील भेगा पडलेल्या निकृष्ट कामाची डॉ.गणेश ढवळे यांनी फोटो सह पोलखोल केल्यानंतर ते फोटो तत्कालीन ग्रामविकासमंत्री पंकजाताई मुंडे यांनी माजी नितीन गडकरी यांना ट्वीट केल्यानंतर याची दखल घेऊन खराब रस्ता पुर्णपणे उखडुन नविन करण्यात आला होता.त्याचप्रमाणे या खराब रस्त्यांचे ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

कोतन येथे मंगळवारी कोतुआई देवी यात्रा उत्सव

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कोतन येथील भाविक-भक्तांचे

श्रद्धास्थान व जागृत देवस्थान जगदंबा कोतुआई देवीचा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि.२८ मे २०२४ मंगळवार रोजी यात्रा उत्सव आयोजित केला असून या उत्सव सोहळ्याचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी बहुसंख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन कोतन ग्रामस्थांनी केले आहे.यानिमित्त देवीची पालखी मिरवणूक तसेच रात्री ९ नंतर शिव मल्हार जागरण पार्टी बारामती यांचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

माजलगाव न.प. मालकीच्या जागेत बेकायदेशीर रस्ता काढून प्लॉटची विक्री

चौकशी करण्याची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगर परिषदेच्या जागेत काही भुमाफियानी रस्ता तयार करून प्लॉटची विक्री सुरू केली असून संबंधितावर योग्य ती कारवाई करावी नसता न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशारा एका निवेदनाद्वारे नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

न.फ.च्या मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, न.प.च्या मालकीच्या स.न.८ आसुन तेथे न.प. ने कर्मचाऱ्यांसाठी वसाहत तयार करण्यासाठी प्लॉट काढून तेथे पक्या नाल्या व रस्ते तयार केले आहेत.स.न. ८ च्या लगत स.न. ८/६ आसुन तेथे काही लोकानी बोगस प्लॉट काढून न.प. च्या स.न. मधुन बेकायदेशीर रस्ता खोदुन रस्ता तयार केला आहे.यावर एक संघटनेचा कुरेशी नावाचा व्यक्तीने न.प.मध्ये तक्रार दिलेली होती परंतु न.प.ने यावर कसलीच कार्यवाही केली नाही.नंतर प्लॉटींग करणांऱ्या लोकांनी कुरेशी नावाच्या व्यक्तीला मॅनेज करुन त्याला गप्प केले नंतर न. प.च्या स.नं. ८ मध्ये धुमाकुळ घातला आसुन सदरील व्यक्तीने तेथे बेकायदेशीर अतिक्रमण करुन नाल्या तोडल्या आहेत तरी संबधीत व्यक्तीवर पोलीस कार्यवाही करुन गुन्हे दाखल करुन न.प.च्या स.न. ८ च्या मालमत्तेचे जतन करावे नसता याप्रकरणी न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशारा या निवेदनात देण्यात आला असून या निवेदनावर सुधाकर वाघमारे व पप्पू पोटभरे यांच्या सह्या आहेत.

दुहेरी व्याज वसुली करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये कारवाई करावी

शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून दुहेरी व्याज वसुली करणाऱ्या बँक आहे अधिकाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये कारवाई करावी.अशी मागणी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्याकडे केली आहे.

पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 'शून्य' टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करावा म्हणून महाराष्ट्र सरकारने ५ जुलै २०१० रोजी परिपत्रक जारी केले. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत, ग्रामीण, खाजगी बँकांच्या अधिकाऱ्यांनी परिपत्रकाचे उल्लंघन करून शेतकऱ्यांकडून दरवर्षी १२ ते १३% व्याज दराने वसुली केली.तसेच राज्य व केंद्र शासनाच्या डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेतूनही व्याजाची वसूली केली आहे. ही बाब लक्षात येताच शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी बीडचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार केली.तक्रारीची दखल घेऊन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ यांना लेखा परीक्षण करण्याचे आदेश दिले.

लेखापरीक्षक वर्ग-१ यांनी जिल्ह्यातील बँक अधिकाऱ्यांनी दुहेरी व्याज वसुली केल्याचा अहवाल सादर केला.त्यानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे राष्ट्रीयीकृत, ग्रामीण, खाजगी बँकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी शिफारस केली आहे.तसेच सहकार आयुक्त पुणे यांनीही कारवाईची शिफारस केली आहे. तरी बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी बँक अधिकाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये फौजदारी कारवाई करावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केली निवेदनात केली आहे.निवेदनावर शेतकरी संघटनेचे धारुर तालुका प्रमुख राधाकिशन गडदे, गणेश चौरे, कुलदीप करपे यांच्या सह्या आहेत.

ज्ञानराधाच्या संचालकासह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा न्यायालयाचा आदेश

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेटने खातेदाराच्या पैशावर डल्ला मारलेला असून त्यापैकीच ज्ञानराधा मल्टीस्टेटने अनेक खातेदारांना चुना लावलेला आहे परंतु पोलीस प्रशासनाकडे अनेक खातेदारांनी ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यांनी संगणमत करून फसवणूक केल्याबाबत रीतसर लेखी तक्रारी दिल्यानंतर देखील पोलीस प्रशासनाने अद्याप गुन्हा दाखल न केल्याने दिलीपकुमार चिंचोलीकर खातेदारानी बीड येथील सत्र न्यायालयात धाव घेऊन ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यावर कलम ४२०, ४०६, ४०९, १२० (ब) भा.दं. वि. प्रमाणे आणि कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थां मधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियम १९९९ अन्वये गुन्हे नोंदवण्याबाबत मागणी केली होती त्यावरप्रकरणात मा.जिल्हा व सत्र न्यायालय बीड यांच्या न्यायालयात ॲड. वीरेंद्र वसंतराव थि गळे यांनी युक्तिवाद केल्यानंतर ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यावर फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करुण तपास करणेबाबतचा आदेश मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड यांनी दि.२४ मे रोजी पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांना दिला आहे.सादर प्रकरणात ॲड.विरेंद्र थिगळे यांनी कामकाज पाहिले व त्यांना ॲड.कालिदास थिगळे व ॲड मिलिंद वघिरकर यांनी मार्गदर्शन केले.

रामकिसन कटारे यांचे वृद्धापकाळाने निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील निष्ठावंत वारकरी रामकिसन तुकाराम कटारे (वय ९३ वर्षे) यांचे राहत्या घरी दि.२४ मे शुक्रवारी सायं. चार वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.

काल शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजता गावातील संत सावता महाराज मंदिराशेजारील मळ्यात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रामकिसन कटारे यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे सर्वंजण त्यांना आपुलकीने दादा म्हणून बोलत असत. त्यांनी पंढरपूरची वारी नित्यनेमाने केली. त्यांच्या आयुष्यात एक हि दिवस त्यांनी दवाखान्याचे तोंड पाहिले नसल्याचे नातेवाईकांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, तीन मुली, पुतणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यावर गुन्हे दाखल करा -ॲड. गोले

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात बियाणांच्या कंपन्या आणि त्यांचे अधिकृत विक्रेते यांनी आपसात संगणमत करून बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला असून शेतकऱ्यास चढ्या भावाने बियाणे विक्री करण्याचा कुटील डाव प्रशासनातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून हाणून पाडावा यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्ह्यातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधून विनंती केलेली आहे परंतु कृषी विभागातील काही अधिकारी जाणीवपूर्वक कंपन्या आणि अधिकृत विक्रेते यांच्या कुटील डावाकडे डोळे झाक करण्याची शक्यता असल्यामुळे शेतकरी बांधवांनी सतर्क राहून प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून होणाऱ्या लुटीची माहिती द्यावी जर प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी सहकार्य करत नसतील तर शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्याकडे चढ्या भावाने विक्री करणाऱ्या अधिकृत विक्रेत्याच्या तक्रारी करण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले असून कृषीमंत्र्याच्या जिल्ह्यातच जर शेतकऱ्याची लुट होत आहे ही बाब खेदाची असल्याचेही त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे..

ॲड.एकनाथ आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त अंबाजोगाईत राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार वितरण व व्याख्यान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शोषित, पिडीत व उपेक्षितांच्या न्याय हक्कासाठी शासन, प्रशासन व प्रस्थापितांच्या विरोधात बंड करून सर्वसामान्य व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्य झिजवणारे कर्मवीर ऍड.एकनाथराव (जिजा) आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाराष्ट्रात उपेक्षित माणसांच्या न्याय हक्कासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्याला प्रेरणा मिळावी. यासाठी युवा प्रतिष्ठान, अंबाजोगाईच्या वतीने समाजात प्रबोधन करणारे, धम्म चळवळ गतीमान करून योगदान देणारांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे हे ८ वे वर्ष आहे. कर्मवीर ऍड.एकनाथराव आवाड राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार-२०२४ चे वितरण व मान्यवरांचे व्याख्यान रविवार, दि.२६ मे २०२४ रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.विजय कुमठेकर (जालना) तर यावेळी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलींद आवाड (जे.एन.यु.दिल्ली) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या प्रसंगी सचिन बगाडे (पुणे) यांना राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार - २०२४ देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या प्रसंगी सत्यशोधक समाज महासंघाचे अध्यक्ष डी.एस.नरसिंगे, सामाजिक कार्यकर्ते आर.डी.जोगदंड, दत्त सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रशांत दहिफळे, स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष शितल लांडगे (केज), भारतीय सत्यशोधक महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शिंदे, ल.सा.क.चे संस्थापक सदस्य नरसिंग घोडके हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अंबाजोगाई येथे रविवार, दि.२६ मे रोजी दुपारी २ वाजता दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, पत्रकार भवन, नगरपरिषद सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन युवा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष व आयोजक अशोक पालके, संतोष नरसिंगे, नकेश कांबळे, धीमंत राष्ट्रपाल, हनुमंत गायकवाड, अविनाश हजारे, नितीन होलबोले, महेंद्र कांबळे, नितीन वाघमारे, दत्ता पालके, हनुमंत रणदिवे, बळीराम उपाडे, रेखा सरवदे, महेश जोगदंड, दशरथ कांबळे, दिपक पालके, राम जोगदंड, प्रशांत भालेराव, प्रदीप कांबळे, सुंदर खाडे, दिलीप पालके, अरूण शिंदे, किशोर वाघमारे, मारूती मस्के, काशिनाथ कांबळे, अशोक ढगे, विवेक जाधव आदींनी केले आहे.

गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या तब्येतीची धनंजय मुंडे यांच्याकडून विचारपूस

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह भ प विठ्ठल महाराज शास्त्री यांचा दोन दिवसांपूर्वी अपघात झाला असून ते सध्या पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचार घेत आहेत. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज महाराजांशी व रुग्णालयातील डॉक्टरांशी दूरध्वनीवरून चर्चा करून महाराजांच्या तब्येतीची विचारपूस केली.

मुंडे कुटुंबीयांच्या वतीने आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते अजय मुंडे यांनी ह भ प विठ्ठल महाराज यांची पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे भेट घेऊन त्यांच्या तब्येतीबद्दल माहिती घेतली. महाराजांच्या एका पायाला दुखापत झाली असून त्यांच्या प्रकृतीत आता सुधारणा होत आहे, अशी माहिती अजय मुंडे यांना डॉक्टरांनी दिली. दरम्यान राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी देखील यावेळी महाराजांशी दूरध्वनीवरून चर्चा करत महाराजांच्या तब्येतीची तसेच त्यांच्यावर सुरू असलेल्या उपचारांची माहिती घेतली व विठ्ठल महाराजांना लवकर आराम मिळावा अशी सदिच्छा व्यक्त केली.

धारूर येथील कब्रस्तानची जागा कागदोपत्री चुकीची माहिती नोंदवून अकृषी करून घेतली

कब्रस्तान वाचविण्यासाठी असीम जरगर यांचे शिष्टमंडळासह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या धारूर तालुक्यातील कब्रस्तान ची जागा कागदोपत्री चुकीची माहिती नोंदवून अकृषी करून घेतली आहे. कब्रस्तान वाचविण्यासाठी असीम जरगर यांनी शिष्टमंडळासह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सर्वे नं. ६२२, ६२३ मौजे धारुर ता. धारुर जि. बीड येथील अकृषी परवानगी नं. २०१२/मशाका/जमा २ अकृषि प/सिआर/ ११ दि.०४.०६.२०१२ रोजीचा अकृषी परवाना रद्द करण्यात यावा. दिलीप हरिनाथ कोमटवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अकृषी परवाना मिळणे बाबत अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या पुर्णपणे चौकशी कार्यवाही झाल्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी कायदेशीर अटी व नियम घालुन देवून दि.०४.०६.२०१२ रोजी अकृषी परवाना मंजुर केला आहे. परंतु सदर अकृषी परवाना मंजुर करतेवेळी संबंधीत महसुल अधिकारी यांनी सदर परवाना देणे बाबत काही अटींची पुर्तता होत नसल्याने त्या खऱ्या व कायदेशीर वस्तुस्थिती लपवल्या आहेत. कारण अकृषी परवानगी मंजुर करतेवेळी अट क्रं. ३ अशी आहे की, प्रस्तावित अकृषी जमीनी जवळ ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातील पब संस्कृती विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील पब संस्कृती विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासाठी मनसेकडून एक सही संतापाची आंदोलन सुरु आहे. पुण्याच्या गुडलक चौकात मनसेकडून आंदोलन सुरू आहे. हिट अँड रन प्रकरणामुळे पब संस्कृती पुन्हा एकदा वादात सापडली आहे. त्यामुळे मनसेने याविरोधात आंदोलन केले आहे.

पुण्यातील हिट अँड रन प्रकरण चर्चेत आल्यामुळे वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने एका दुचाकीला धडक दिल्याने दोन जण जागीच ठार झाले होते. मुलगा अल्पवयीन असल्याने त्याला लगेचच जामीन मिळाला होता. पण त्यानंतर लोकांनी नाराजी व्यक्त केली. हे प्रकरण चर्चेत आल्याने दबाव वाढला.

खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याची दखल घेतली.

या प्रकरणात मुलगा, वडील आणि आजोबा असे तिघे ही जण सध्या तुरुंगात आहेत. मुलगा अल्पवयीन असताना देखील त्याला गाडी दिल्याने वडिलांवर गुन्हा दाखल झाला आहे. वडील विशाल अग्रवाल हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. दुसरीकडे आजोबांनी हा गुन्हा आपल्या अंगावर घ्यावा म्हणून त्यांच्या ड्राईव्हरवर जबरदस्ती केली आणि त्याला दोन दिवस डांबून ठेवल्याने सुरेंद्र अग्रवाल यांना देखील अटक झाली असून कोर्टाने त्यांना २८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

कल्याणीनगर पुणे अपघाताच्या पार्श्वभूमीवर गेल्या तीन दिवसात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहिमेत शहरातील तसेच जिल्ह्यातील ४९ पब आणि बारवर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात केले आहेत. त्यातील बरेच पब आणि बार बंद करून सील करण्यात आले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी सांगितले की, कल्याणी नगर अपघाताच्या घटनेनंतर ४९ पब आणि बारवर कारवाई करण्यात आलीये. घटनेच्या आधी एप्रिल आणि मे महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने ५७ पब आणि बार वर कारवाई करण्यात आली होती. गेल्या वर्षभरात २५७ ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. तसेच या कारवाई मध्ये १ कोटी १२ लाख रुपयांच दंड देखील वसूल करण्यात आला आहे. विना परवाना मद्य विक्री करणाऱ्या पब आणि बार वर कारवाई करण्यात येत असून ही कारवाई अशीच पुढे चालू राहणार असल्याचं यावेळी त्यांनी सांगितल.

रोहकडी येथे भरवस्तीत बिबट्याचे पिल्लासह दर्शन

ओतूर । प्रतिनिधी

रोहकडी येथे आज (दि.२५) दुपारी बिबट्या मादीचे दोन पिल्लांसह दर्शन झाले. तेथून मार्गस्थ होणाऱ्या प्रवाशांनी आपल्या मोबाईलमध्ये बिबट्या मादीला कैद केले. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर घटनास्थळी लोकांना गर्दी केली होती. वर्दळ आणि मानवी वस्ती असलेल्या स्त्यावर वन्यप्राणी येऊ लागल्याने लोकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.

स्थानिकांकडून मिळालेली माहितीनुसार, रोहकडी परिसरात मोठ्या प्रमाणात बिबटयांची संख्या असून शेतकऱ्यांना शेतात काम करणे अवघड झाले असल्याचे त्यांनी सांगितले. मागील काही दिवसांपूर्वी पिंपरी पेंढार येथे महिलेवर आणि तिच्या बाळावर बिबट्याने हल्ला केला होता. या घटनेत आईसह ८ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. या दोन्ही घटना ताज्याच असल्याने जुन्नर तालुक्यात भितीचे वातावरणात नागरिक वावरत आहेत.



जुन्नर तालुक्यात प्रत्येक गावात बिबट्यांचे दिवसा आणि रात्री दर्शन घडू लागले आहे. संपूर्ण तालुका बिबट्यांचे साम्राज्य निदर्शनास येत असून बिबट्या मुक्त तालुका कधी होणार? असा सवाल देखील नागरिक करू लागले आहेत. वन विभागाने याबाबत तात्काळ पावले उचलून मानवाला भयमुक्त करावे, अशी मागणी होत आहे.

तळेगाव स्टेशन तळ्यात बुडून युवकाचा मृत्यू

तळेगाव । प्रतिनिधी

तळेगाव दाभाडे स्टेशन भागातील तळ्यामध्ये गुरूवारी (दि.२३) अनिकेत घनश्याम तिवारी(वय१८) या युवकाचा बुडून मृत्यू झाला. अनिकेत तिवारी डी वाय पाटील कॉलेज (आंबी ता.मावळ) येथे शिक्षण घेत होता. मंत्रासीटी तळेगाव दाभाडे येथे राहत होता. तो मुळचा अभनपुरचा (छत्तीसगड) आहे.

अनिकेत तळ्यावर पोहण्यासाठी मित्रांसोबत गेला होता. पोहताना पाण्याचा अंदाजन आल्याने बुडून त्याचा मृत्यू झाला. ही घटना ५ च्या सुमारास उघडकीस आली यानंतर अनिकेतचे शोधकार्य सुरु केले. सायंकाळी सुमारे ७.३०वा.पर्यंत शोधकार्य चालु होते. अंधार पडल्याने शोधकार्य थांबविण्यात आले. परत, शुक्रवारी(दि.२४) सकाळी ६.३०वा.सुमारास शोधकार्य सुरु केले असता सकाळी ७.४५ च्या सुमारास अनिकेतचा मृतदेह मिळाला.

या शोधकार्यात निलेश गराडे, अनिल आंद्रे, अनिश गराडे, गणेश गायकवाड, गणेश सोंडेकर, गणेश ढोरे, अविनाश कार्ले, कुंदन भोसले, ताहीर मोमीन, श्रीसंत भेगडे, कुणाल दाभाडे, शुभम काकडे, शेखर खोमणे, धीरज शिंदे, तळेगाव दाभाडे नगरपरिषद अग्निशमन दल, पोलीस यांनी सहभाग घेतला.

गृहमंत्री महोदय, आता तरी जागे व्हा : सुप्रिया सुळेंची पोस्ट चर्चेत

पुणे : जिल्ह्यातील इंदापूर तालुक्याचे तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यावर अज्ञातांनी मिरची पूड टाकून हल्ला केला. या घटनेनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी, गृहमंत्री महोदय, आता तरी जागे व्हा. आपल्या राज्यात गाडीखाली माणसं चेंगरणारे आपल्या खात्याच्या कृपेमुळे जामीनावर सुटतात. या घटनेचा निषेध अशी पोस्ट करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?

इंदापूर तहसीलदार यांच्यावरील हल्ला ही अतिशय गंभीर आणि संतापजनक घटना आहे.

गुन्हेगारांना कसलाही धाक उरलेला नाही., संपूर्ण घटनेची पोलीसांनी गंभीर दखल घेऊन तातडीने कारवाई करण्याची गरजेचे आहे.

वडगाव आनंद येथील नारळाच्या झाडावरील बिबट्या कॅमेऱ्यात कैद

आळेफाटा । प्रतिनिधी

बिबट्याचे नेहमी दर्शन होत असलेल्या वडगाव आनंद (ता. जुन्नर) परिसरातील चौगुलेवस्ती येथे शुक्रवारी (दि.२४) सकाळी आठच्या सुमारास बिबट्या शेतातील नारळाचे झाडावर चढताना व उतरतानाचा थरार शेतकऱ्यांने आपल्या मोबाईलमध्ये केला आहे.



आळेफाटा, वडगाव आनंद, आळे परिसरात बिबट्याचा मोठा वावर आहे. बिबट्याचे ठिकठिकाणी दर्शन नागरिकांना होत आहे. शुक्रवारी (दि.२४) सकाळीच्या सुमारास चौगुलेवस्ती परिसरातील राजाराम बाबुराव चौगुले यांच्या शेतातील नारळाच्या झाडावर बिबट्या चपळाईने २० फुटापर्यंत गेला त्यांनतर काही वेळातच खाली उतरून शेजारील उसाचे शेतात गेला. या घटनेने त्या परिसरात भीतीचे वातावरण तयार झाले आहे. बिबट्याच्या या हालचालींचा थरार तेथील शेतकऱ्यांच्या मोबाईल कॅमेऱ्या मध्ये कैद झाला आहे. या परिसरात तातडीने पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीने केल्यानंतर या ठिकाणी पिंजरा लावणार असल्याची माहिती आळे वनपरिक्षेत्र वनपाल संतोष साळुंखे यांनी दिली.

पोर्शे अपघात प्रकरण : पुणे आयुक्तांनी दिली धक्कादायक माहिती, म्हणाले...

पुणे । प्रतिनिधी

पोर्शे कार अपघात प्रकरणातील आपल्या नातवाला वाचविण्यासाठी सुरेंद्रकुमार अग्रवाल याने ड्रायव्हर गंगाराम पुजारी याला दोन दिवस डांबून ठेवले. तु जर खर बोललास जर तुला बघून घेईन अशी धमकीही दिली, अशी धक्कादायक माहिती आज (दि.२५मे) पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

काय म्हणाले पोलिस आयुक्त?

पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीच्या आजोबांनी कार चालकाला डांबून ठेवले.

तु जर खर बोललास तर तुला बघून घेईन अशी धमकी ड्रायव्हर गंगाराम पुजारी याला दिली.

आजोबांवर अपहरण आणि धमकीचा गुन्हा दाखल झाला आहे

तू जर खर बोललास तर

पत्रकार परिषदेत पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, तू जर खर बोललास जर तुला बघून घेईन, अशी धमकी संशयित अल्पवयीन आरोपीचे आजोबा सुरेंद्र अग्रवाल याने कार ड्रायव्हर गंगाराम पुजारी याला दिली. गंगाराम पुजारी याला दोन दिवस घरी न पाठवता तब्बल ४८ तास डांबून ठेवेल. आपल्या नातवारील आरोप स्वत:वर घे असा दबाव आणला. आरोप स्वत:वर घेतले नाहीस आणि तू जर खर बोललास जर तुला बघून घेईन. अशी धमकीही त्याला दिली.

काय आहे पुणे पोर्शे कार अपघात प्रकरण?

मद्यधुंद अल्पवयीन मुलाने भरधाव पोर्शे कारने चालवत रविवारी (दि.१९) पुण्यातील दोन आयटी इंजिनिअरला चिरडले. अश्विनी कोस्टा व अनिस अवधिया असे मृत तरुण-तरुणीचे नाव आहे. अश्विनी ही मूळची मध्य प्रदेशमधील जबलपूर येथील आहे. तर अनिसची आई-वडील वृद्ध असून, अनिस हा त्यांचा एकमेव मुलगा होता. दोघांनीही त्यांचे कम्प्युटर सायन्सचे शिक्षण पूर्ण केले होते. दरम्यान अल्पवयीन संशयित आरोपीने पोलिसांना सांगितले आहे की, मी दारु पीत असल्याचे वडिलांना माहित होते. त्यांनीच मला कार दिली. या प्रकरणी दाखल गुन्ह्यात नमूद करण्यात आलं आहे की, आरोपीकडे वैध वाहन परवाना आणि कार चालवण्याचे वैध प्रशिक्षण नाही, हे माहित असुनही त्याच्या वडिलांना त्याला कार चालवायला दिली होती. त्याचबरोबर त्याला पार्टी करायला परवानगीही दिली होती. आरोपीचे वडिल यांच्यासह चारजणांना अटक केली आहे.

'हिट अँड रन' प्रकरणानंतर शहरात मोठी कारवाई, तब्बल ४९ पब आणि बार सील

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर आता इतर पब आणि बार मालकांचे धाबे दणालले आहेत. कारण या अपघातानंतर काही पबमधील व्हिडीओ सोशल मीडियावर शेयर करण्यात आले होते. त्यामुळे पोलीस यंत्रणेवरही विरोधकांनी गंभीर आरोप केले. आता या अपघात प्रकरणानंतर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील ४९ पब आणि बारवर कारवाई

कल्याणीनगर पुणे येथील अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मागील तीन दिवसात १४ पथकांमार्फत राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेत शहरातील तसेच जिल्ह्यातील ४९ पब आणि बार वर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले असून ते बंद करून सील करण्यात आले आहे.याबाबतची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी दिली.



ल्याणी नगर येथील अपघातानंतर जवळपास ४९ पब आणि बार वर कारवाई करण्यात आली आहे.या घटनेच्या पूर्वी देखील एप्रिल आणि मे महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने ५७ पब आणि बार वर कारवाई करण्यात आली होती. तसेच गेल्या वर्षभरात २५७ ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.तसेच या कारवाई मध्ये १ कोटी १२ लाख रुपयांच दंड देखील वसूल करण्यात आलं आहे, असं चरणसिंग राजपूत म्हणाले.

या कारवाई मध्ये पब आणि बार च्या वेळा, तसेच त्यांच्या प्रिमायसेस मध्ये काही बदल केला आहे का? तसेच रफटॉप बाबत आलेल्या तक्रारी, विना परवाना मद्य विक्री करणाऱ्या पब आणि बार वर कारवाई करण्यात येत असून ही कारवाई अशीच पुढे चालू राहणार असल्याचं यावेळी चरणसिंग राजपूत म्हणाले.

खेडमध्ये यंदाही मुलींचीच बाजी; ४ शाळांची शंभरीपार

राजगुरुनगर । प्रतिनिधी

खेड तालुक्याचा इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल ९३.५९ टक्के लागला. यंदाही मुलींनीच बाजी मारली. तालुक्यात यावर्षी केवळ ४ शाळांचा निकाल १०० टक्के लागला. खेड तालुक्यातून बारावीच्या परीक्षेला ३३ कनिष्ठ महाविद्यालयाचे ५ हजार २३२ विद्यार्थी बसले होते. यापैकी ४ हजार ८९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९६.९४ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर ९०. ५५ टक्के मुले उत्तीर्ण झाली आहेत. तालुक्यात सर्वाधिक कमी ६२. ०६ टक्के निकाल सुभाष माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज, बहुळचा लागला आहे.

इतर महाविद्यालयांचा निकाल पुढीलप्रमाणे - हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर - (९३. २७), कर्मवीर भाऊराव पाटील ज्युनियर कॉलेज, वाडा(९४. ६९), सीताबाई पाटोळे ज्युनियर कॉलेज,चाकण (९७. ५९), संत ज्ञानेश्वर विद्यालय ज्युनियर कॉलेज, आळंदी (९४.४७ टक्के), म.फ.गायकवाड विद्यालय ज्युनियर कॉलेज, दावडी(८५. ७१), रामभाऊ म्हाळगी विद्यालय ज्युनियर कॉलेज, कडूस (६४. ७०, सुमंत उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपरी बुद्रुक (६६. ६६), नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,मरकळ(९६. २३), शिवाजी विद्यालय, डेहणे(८१. ९१), रामचंद्र पाटील औटी उच्च माध्यमिक विद्यालय,आळंदी(७०. ९०), आर्ट्स, कॉमर्स ज्युनिअर कॉलेज,पाईट (९०.६९), महात्मा गांधी विद्यालय व ज्युनियर कॉलेज, राजगुरुनगर(१००), नवचैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय,काळूस (८५. ३३).

श्री भामचंद्र विद्यालय, भांबोली (९७. ४३), पी. के. कॉलेज कडाचीवाडी, चाकण(९४. ५९), उच्च माध्यमिक विद्यालय,वाशेरे (८८. ४६), नवमेश विद्यालय, चाकण (६८), श्रीसमर्थ माध्यमिक विद्यालय, चिंबळी (९९.४२), बी. एम. पवार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,बिरदवडी (८७.५०), आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज, डेहणे (८२. ७२), आर्ट्स कॉमर्स कॉलेज, राजगुरुनगर (९८.१९), श्रीसमर्थ ज्युनिअर कॉलेज, नाणेकरवाडी(९९. ७०, ज्ञानवर्धिनी ज्युनियर कॉलेज, खेड (९३.५०),मॉडर्न हायस्कूल व ज्युनियर कॉलेज,भोसे (१००), प्रियदर्शनी हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, वाकी (१००),श्रीशिवाजी विद्यालय व ज्युनियर कॉलेज, शेलपिंपळगाव (८९. ३६), डायनॅमिक इंग्लिश मीडियम व ज्युनियर कॉलेज, कडूस (१००), होली अँगल स्कूल व ज्युनियर कॉलेज, चाकण (९६.७२), गव्हर्नमेंट आयटीआय, खेड (८७.८७), आदिराज प्राव्हेट आयटीआय खेड (७५), हुतात्मा राजगुरु महाविद्यालय,राजगुरुनगर (९०. ४७),शिवाजी विद्यामंदिर व सीताबाई भिकोबा शेठ ज्युनिअर कॉलेज, चाकण (९८.६१).

वादळी वाऱ्याने केळीच्या बागा जमीनदोस्त; पंचनामे करून भरपाईची मागणी

कालठण । प्रतिनिधी

इंदापूर तालुक्यातील कालठण नंबर १, कळाशी, गंगावळण, शिरसोडी, पडस्थळ येथे मंगळवारी (दि. २१) सायंकाळी वादळी वार्यासह झालेल्या अवकाळी पावसाच्या तडाख्याने अनेक शेतकर्यांच्या केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या; तर आंबा, कांदा, ऊस पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. यामध्ये शेतकर्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे बाधित शेतकरी हतबल झाले असून, झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून भरपाई देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

इंदापूर तालुक्यातील उजनी धरण पाणलोट क्षेत्रालगतच्या गावात वादळी वार्याने थैमान घातले. यात अनेक शेतकर्यांच्या केळीच्या बागा अक्षरश: जमीनदोस्त झाल्या. बागांमध्ये सध्या केळी तोडणीचे काम सुरू होते. मात्र, अचानक आलेल्या वादळी वार्यासह पावसाने बागांचे प्रचंड नुकसान झाले. पाणीटंचाईच्या काळात देखील मोठ्या कष्टाने पिकवलेली व हाता-तोंडाशी आलेली केळीची बाग डोळ्यांदेखत उद्ध्वस्त झाल्याने अनेक शेतकरी धाय मोकलून रडत होते. केळीबरोबरच कांदा, ऊस उत्पादकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा भिजला आहे.

त्याचबरोबर आंब्याच्या कैर्या मोठ्या प्रमाणावर झाडावरून पडल्या आहेत, तर ऊसही झोडपला गेला असून, तो आडवा पडला आहे. त्यामुळे महसूल आणि कृषी विभागाने तातडीने नुकसान झालेल्या भागातील पिकांसह बागांचे पंचनामे करावेत. किमान एकरी एक लाख रुपयांची भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे. याशिवाय अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे, विजेचे खांब उन्मळून पडले आहेत. घरे, गोठे, पोल्ट्री शेडवरील पत्रे उडून गेले आहेत. सायंकाळपासून वीजपुरवठा गायब झाला आहे. त्यामुळे गावोगावी पाणीपुरवठा करणार्या नळ पाणी योजना बंद पडल्या आहेत. रस्त्यावर पडलेली झाडे हटविण्याचे तसेच विजेचे खांब पुन्हा उभे करण्याची कामे रात्री उशिरापर्यंत सुरू होती.